cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६५ | सोमवार दि.२५ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महागाईच्या आगीत होरपळणारी जनता आणि इंधनदरवाढीचे दुष्टचक्र

केंद्र सरकारने अवघ्या आठवडाभरात दुसऱ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात केलेली वाढ ही आधीच महागाईच्या विळख्यात सापडलेल्या सर्वसामान्य जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरली आहे. दरवाढ केवळ ९० पैशांची असल्याचे सांगून तिचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न होत असला, तरी अर्थव्यवस्थेवर होणारा तिचा परिणाम अत्यंत व्यापक आणि दूरगामी आहे. इंधन हे केवळ वाहन चालविण्याचे साधन नसून संपूर्ण अर्थचक्राचा कणा आहे. त्यामुळे पेट्रोल–डिझेलचे दर वाढले की त्याची झळ प्रत्येक घरापर्यंत पोहोचते.

# कांदा दराचा वांदा शेतकरी हवालदिल

## उत्पादन खर्च १८ रुपये, बाजारभाव ६; शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात कांदा उत्पादक शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक संकटाच्या खाईत लोटला गेला असून बाजारात कांद्याला अवघा एक रुपया प्रति किलोपर्यंत नीचांकी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. उत्पादन खर्च गगनाला भिडला असताना बाजारभाव मात्र कोसळल्याने अनेक शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. गेल्या चार महिन्यांत विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विक्री झालेल्या कांद्यामध्ये शेतकऱ्यांच्या खिशातील कोट्यवधी रुपये बुडाल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून केंद्र सरकारच्या निर्यातबंदी आणि ग्राहकधार्जिण्या धोरणामुळेच ही परिस्थिती उद्भवल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.**



मागील खरीप हंगामात कांद्याला सुरुवातीच्या काळात काही प्रमाणात समाधानकारक दर मिळाले होते. मात्र अतिवृष्टी आणि बदलत्या हवामानामुळे उत्पादनात मोठी घट झाली. परिणामी ज्या शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने कांद्याची लागवड केली होती, त्यांना उत्पादन घटल्याने अपेक्षित नफा मिळू शकला नाही. त्यानंतर रब्बी हंगामात परिस्थिती आणखी बिकट झाली. नोव्हेंबरपासून कांद्याचे दर सातत्याने घसरत गेले असून अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर उत्पादन खर्चापेक्षाही कमी राहिले आहेत. सध्या कांदा उत्पादनाचा खर्च प्रतिकिलो सुमारे १८ रुपयांपर्यंत पोहोचला असल्याचे शेतकरी सांगत आहेत. बियाण्यांचे वाढलेले दर, मजुरीचा वाढलेला खर्च, रासायनिक खतांच्या किमतींमध्ये झालेली मोठी वाढ, औषध फवारणीवरील खर्च तसेच हवामानातील अनिश्चितता यामुळे उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. अशा परिस्थितीत बाजारात कांद्याला सरासरी केवळ ६ रुपये प्रति किलो दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना प्रतिकिलो १० ते १२ रुपयांचा थेट तोटा सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी तर कांद्याला अवघा एक रुपया दर मिळाल्याने वाहतूक खर्चही निघत नसल्याची अवस्था निर्माण झाली आहे. बाजार समित्यांमध्ये कांदा विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना अनेकदा हमाल खर्च, वाहतूक, वर्गीकरण आणि बाजार शुल्क भरल्यानंतर हातात अत्यल्प रक्कम उरत असल्याचे ▶▶ पान २ वर

# १२ खासदारांना 'संसदरत्न' सन्मान जाहीर, महाराष्ट्राला सर्वाधिक ५ पुरस्कार

**दिल्ली । वृतसंस्था**

संसदेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १२ खासदारांसह ४ संसदीय स्थायी समित्यांची 'संसदरत्न पुरस्कार २०२६'साठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक ५ खासदारांचा समावेश आहे. लोकसभा आणि राज्यसभेतील खासदारांच्या संसदीय कामगिरीच्या आधारे यंदा १० लोकसभा खासदार आणि २ राज्यसभा खासदारांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातून शिवसेना शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, भाजपच्या डॉ. मेधा कुलकर्णी, स्मिता वाघ, हेमंत सावरा यांची निवड करण्यात आली. तसेच अन्य खासदारांमध्ये जगदंबिका पाल, पी. पी. चौधरी, निशिकांत दुबे, प्रवीण पटेल, विद्युत महतो, लुबाराम चौधरी, नरहरी अमीन यांचाही पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे. संसद सदस्यांच्या ▶▶ पान २ वर




# बीडमध्ये राजकीय नेत्याच्या मुलाकडून महिलेवर अत्याचार

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील एका राजकीय पुढाऱ्याच्या मुलाने विवाहित महिलेला ब्लॅकमेल करून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पीडित महिलेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन रीतसर तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.**


बीड शहरातील चऱ्हाटा रोड भागात राहणाऱ्या आणि हल्ली शहादा जिल्हा नंदुरबार येथे वास्तव्यास असलेल्या महिलेवर अमर



बांगरने वारंवार बळजबरी केली. तसेच, तक्रार देण्याचा प्रयत्न केल्यास ▶▶ पान २ वर

# पाऊस पडताच पेरणी करण्याची घाई करु नका

## परभणी कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांचे शेतकऱ्यांना आवाहन



**परभणी । प्रतिनिधी**

यंदा मान्सून राज्यात वेळेवर दाखल होणार असल्याची माहिती आहे. हवामान विभागाने मान्सून वेळेवर दाखल होणार असल्याची माहिती याआधीच दिली आहे. असं असलं तरी मान्सून पूर्व आलेल्या पावसानंतर लगेच शेतकऱ्यांनी पेरणी करण्याची घाई करु नये, असं आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आलं आहे. राज्यभरात २९ मे पासून मान्सपूर्व पाऊस पडणार असल्याचा अंदाज वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे हवमान शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कैलास डाखेरे यांनी म्हटलं आहे. राज्यात मान्सून वेळेत दाखल होण्याची शक्यता आहे. पण शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरण्यांची घाई करु नये, असा सल्ला त्यांनी दिला आहे. ▶▶ पान २ वर

# मोटेगावकरचे पुण्यात कोट्यवधींचे 'काळे साम्राज्य'

**पुणे/लातूर । प्रतिनिधी**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट' प्रवेश परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता तीव्र गती आली आहे. या घोटाळ्याचे धागेदोरे थेट महाराष्ट्रातील लातूर आणि पुण्याशी जोडले गेले असून, यातील प्रमुख आरोपी आणि लातूरमधील प्रसिद्ध 'आरसीसी' क्लासेसचा संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याच्या आर्थिक व्यवहारांबाबत अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या




अटकेनंतर आता या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने देखील उडी घेतली असून मोटेगावकरच्या बेनामी मालमत्तांची चौकशी सुरू केली आहे. ▶▶ पान २ वर

# शेतकऱ्यांना साठेबाज ठरवून सरकारची 'सर्कस' सुरू–दानवे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात आणि देशात सरकारच्या नावाखाली सध्या निव्वळ सर्कस सुरू असल्याचा घणाघात विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे.



पेरणीच्या तोंडावर बियाणे आणि डिझेलसाठी व्याजाने पैसे उभे करणाऱ्या शेतकऱ्यांनाच सरकार साठेबाज ठरवत असल्याची टीका त्यांनी केली.

कथित साठेबाजी होत ▶▶ पान २ वर

# ९४% फॉलोअर्स भारतीयच...!

## भाजपच्या आरोपावर 'कॉकरोच जनता पार्टी'च्या संस्थापकाचे प्रत्युत्तर

**दिल्ली । वृतसंस्था**

सोशल मीडियावरील आपल्या फॉलोअर्सपैकी निम्मे फॉलोअर्स हे पाकिस्तानमधील असल्याचा भाजप नेत्यांचा दावा 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी शनिवारी पूर्णपणे फेटाळून लावला आहे. तरुणांमध्ये अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या आणि सध्या राजकीय वादाच्या केंद्रस्थानी आलेल्या या डिजिटल चळवळीचे ९४ टक्क्यांहून अधिक फॉलोअर्स भारतीयच असल्याचा दावा दिपके यांनी केला आहे. बेरोजगारी, शैक्षणिक धोरण आणि कथित पेपरफुटी यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर मीम्स आणि उपरोधिक भाष्यांद्वारे या प्लॅटफॉर्मने इंटरनेटवर मोठी ▶▶ पान २ वर

# दहा महिन्यांत मोदी सरकार कोसळणार

## राहुल गांधींच्या दाव्यावर मुख्यमंत्र्याकडवून शेलक्या शब्दांत प्रत्युत्तर

**नागपूर । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार पुढील दहा महिन्यांत कोसळेल, असा दावा काँग्रेसच्या बैठकीत केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी त्यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. नागपुरात आयोजित गोदाम लॉजिस्टिक पार्कचा शुभारंभ कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राहुल गांधी यांना टोला लगावत म्हणाले की, 'मुंगेरीलाल के हसीन सपने ही मालिका यायची, राहुल गांधी यांच्या वक्तव्यातून त्याचाच प्रत्यय येतो.'

दरम्यान, नागपुरात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक लॉजिस्टिक पार्कच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूरच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासावर भर दिला. नागपूर आता देशातील महत्त्वाचे लॉजिस्टिक हब म्हणून उदयास येत आहे. या प्रकल्पामुळे विदर्भाच्या विकासाला मोठी चालना मिळणार ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### जगभरात इबोलाचा मोठा धोका

जीनिव्हा : डब्ल्यूएचओने काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक आणि युगांडातील उद्रेकाची गंभीर दखल घेत इबोला आजाराला 'आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी' म्हणून अधिकृतपणे घोषित केले आहे. आरोग्य संघटनेच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रतिक्रिया उमटल्या असून, भारत सरकारनेही प्रवासाबाबत खबरदारीची नियमावली (ट्रॅव्हल ॲडव्हायझरी) जारी केली आहे. हा उद्रेक इबोला विषाणूच्या दूर्मिळ 'बुंदिबुग्यो' स्ट्रेनमुळे झाला आहे, ज्यावर सध्या कोणतेही मान्यताप्राप्त लस किंवा उपचार उपलब्ध नाहीत.काँगोच्या तीन प्रांतांमध्ये ८६७ संशयित रुग्णांपैकी २०४ मृत्यूंची नोंद झाली आहे. २०१४ ते २०१६ मधील पश्चिम आफ्रिकेतील साथीनंतरचा हा इतिहासातील दुसरा सर्वात मोठा इबोला उद्रेक ठरला आहे.

### व्हाईट हाऊसबाहेर अंदाधुंद गोळीबार

वॉशिंग्टन डीसी : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सुरक्षेत पुन्हा एकदा मोठी त्रुटी निर्माण झाल्याचे समोर आले आहे. शनिवारी सायंकाळी व्हाईट हाऊसजवळ अज्ञात हल्लेखोराने अंदाधुंद गोळीबार केला. ही घटना घडली तेव्हा डोनाल्ड ट्रम्प व्हाईस हाऊसमध्ये उपस्थित होते. व्हाईट हाऊस किंवा डोनाल्ड ट्रम्प उपस्थित असलेल्या परिसरात गोळीबार होण्याची महिन्याभरातील ही तिसरी घटना असून यामुळे अमेरिकेत एकच खळबळ उडाली आहे.दरम्यान, सिक्रेट सर्व्हिसने प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात हल्लेखोर ठार झाला आहे. नासिर बेस्ट (वय २१) असे हल्लेखओराचे नाव असल्याची माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिका–यांनी दिली आहे. आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याने सिक्रेट सर्व्हिसने प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात हल्लेखोर गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला.

### पाकमध्ये भीषण स्फोटात २३ ठार

क्वेटा : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात एक अत्यंत भीषण आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. क्वेटा येथील चमन गेटजवळ एका ट्रेनला लक्ष्य करून आत्मघाती हल्ला करण्यात आला आहे. रेल्वे रुळाजवळ झालेल्या या शक्तिशाली स्फोटात किमान २३ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, अन्य ४७ जण गभीर जखमी झाले आहेत.हा स्फोट इतका भीषण होता की त्यामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आणि नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. स्फोटानंतर घटनास्थळी मोठा गोंधळ उडालेला पाहायला मिळाला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासन आणि मदत पथकांनी तात्काळ धाव घेतली. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ मे २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ६४.५० क्विंटल | २,०७० | ६,६०० | २,६०६ |
| ज्वारी/हायब्रिड : ६७.०० क्विंटल | १,९०१ | ३,२३५ | २,३८६ |
| मका/लोकल: ६.५० क्विंटल | १,९२२ | १,९२२ | १,९२२ |
| तूर : -- क्विंटल | -- | -- | -- |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरी: २६.५० क्विंटल | २,३२५ | ३,६१० | २,७६४ |
| मुग: -- क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:-- क्विंटल | -- | -- | -- |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ५,६४१ | ५,६४१ | ५,६४१ |

# तरुण पिढीचा अनोखा राजकीय विद्रोह

## 'कॉकरोजने उडवून दिली प्रस्थापित पक्षांची झोप

**डिजिटल विद्रोह**
उतरून दगडफेक करण्यापेक्षा डिजिटल माध्यमातून आपला संताप व्यक्त करत आहे.

**बेरोजगारीचा मुख्य मुद्दा**
पदव्या असूनही हाताला काम नसणे आणि राजकीय पक्षांकडून केवळ आश्वासनांची खैरात मिळणे, याविरुद्धचा हा एक सुशिक्षित आणि शांततापूर्ण निषेध होता.

**प्रस्थापितांची भीती**
एका काल्पनिक आणि उपरोधात्मक पक्षाचे खाते ब्लॉक केले जाणे हेच दर्शवते की, तरुणांच्या या डिजिटल युतीचा धसका कुठेतरी प्रस्थापित यंत्रणेने घेतला आहे.




**मुंबई–बीड । प्रतिनिधी**

**सध्याच्या बदलत्या डिजिटल युगात तरुण पिढी राजकारणाकडे केवळ मूक प्रेक्षक म्हणून पाहत नाही, तर त्यावर आपल्याच शैलीत भाष्य करत आहे. नुकतीच सोशल मीडियावर सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी एकत्र येत सुरू केलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' या एका काल्पनिक आणि उपरोधात्मक पक्षाने संपूर्ण राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. या डिजिटल पक्षाने प्रस्थापित राजकीय पक्षांचे अनेक रेकॉर्ड्स मोडीत काढल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. मात्र, या वादळानंतर या अनोख्या पक्षाचे सोशल मीडिया खाते ब्लॉक करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**

डिग्री हातात असूनही नोकरी




मिळत नसल्याने निर्माण झालेली हतबलता आणि सध्याच्या राजकीय चिखलफेकीला कंटाळलेल्या काही सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी सोशल मीडियावर 'कॉकरोच जनता पार्टी' नावाचे एक हँडल किंवा पेज तयार केले होत''ज्याप्रमाणे कॉकरोच (झुरळ) अत्यंत कठीण परिस्थितीतही स्वतःला जिवंत ठेवतो आणि कुठेही तग धरू शकतो, त्याचप्रमाणे आजचा सुशिक्षित बेरोजगार तरुण या महागाईत आणि बेरोजगारीत स्वतःचा जीव मुठीत धरून जगत आहे,'' असा उपरोधात्मक संदेश या पक्षाच्या माध्यमातून देण्यात आला होता. या पक्षाने कोणत्याही राजकीय सभेविना किंवा पैशांच्या बळाविना केवळ आपल्या धारदार मीम्स , उपरोधात्मक पोस्ट ▶▶ पान २ वर

# मोटेगावकरांचा विद्यार्थ्यांवर जादू टोण्याचा व्हिडिओ व्हायरल

**लातूर । प्रतिनिधी**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटीप्रकरणात सीबीआयने लातूरमधील आरसीसी क्लासेसचे सर्वेसर्वा शिवराज मोटेगावकर यास अटक केली आहे. नीट पेपर फोडण्यात मोटेगावकरचा थेट सहभाग असून त्याने ८ दिवस अगोदरच प्रश्नपत्रिका मिळवल्याचं सीबीआयच्या तपासातून समोर आलं.आता, मोटेगावकरचा एक अंधश्रद्धा पसरवणारा व्हिडिओ व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. त्यावर, अंधश्रद्धा निर्मुलन समितीने प्रतिक्रिया देत, पोलीस तपासाची मागणी केली.

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे आधीच राज्यभर चर्चेत असलेल्या शिवराज मोटेगावकर यांचा आणखी एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये ते विद्यार्थ्यांवर तांब्याच्या भांड्यातील पाणी गवताच्या सहाय्याने शिंपडताना दिसत असल्याचा दावा केला जात आहे. या व्हिडिओनंतर विविध स्तरातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काहींनी तर हा अशोक खरातसारखाच घोर प्रकार असल्याची भावना सोशल मीडियातून व्यक्त केलीय. आता, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याध्यक्ष माधव बावगे यांनीही अशा ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# महागाईच्या आगीत होरपळणारी जनता आणि इंधनदरवाढीचे दुष्टचक्र

केंद्र सरकारने अवघ्या आठवडाभरात दुसऱ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात केलेली वाढ ही आधीच महागाईच्या विळख्यात सापडलेल्या सर्वसामान्य जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरली आहे. दरवाढ केवळ ९० पैशांची असल्याचे सांगून तिचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न होत असला, तरी अर्थव्यवस्थेवर होणारा तिचा परिणाम अत्यंत व्यापक आणि दूरगामी आहे. इंधन हे केवळ वाहन चालविण्याचे साधन नसून संपूर्ण अर्थचक्राचा कणा आहे. त्यामुळे पेट्रोल-डिझेलचे दर वाढले की त्याची झळ प्रत्येक घरापर्यंत पोहोचते. आधीच गगनाला भिडलेली महागाई आणि त्यात बाजारात निर्माण झालेली कृत्रिम इंधनटंचाई यामुळे सामान्य नागरिक अक्षरशः होरपळून निघत आहे.

या परिस्थितीचा सर्वाधिक फटका ग्रामीण भारताला आणि कृषी क्षेत्राला बसत आहे. सध्या खरीप हंगामाच्या पूर्वतयारीचा महत्त्वाचा काळ सुरू आहे. आधुनिक शेती पूर्णपणे डिझेलवर आधारित यंत्रणांवर अवलंबून आहे. ट्रॅक्टर, पंप, मळणी यंत्रे, कापणी यंत्रे याशिवाय शेतीची कामे अशक्य झाली आहेत. अशा वेळी डिझेलची टंचाई आणि वाढते दर यामुळे शेतकऱ्यांचे नियोजन कोलमडले आहे. वेळेत मशागत आणि पेरणी झाली नाही, तर त्याचा थेट परिणाम अन्नधान्य उत्पादनावर होणार आहे. म्हणजेच आजची इंधनटंचाई उद्याच्या अन्नधान्य तुटवड्याचे आणि आणखी भीषण महागाईचे बीज ठरू शकते. सरकारकडून या परिस्थितीवर दिली जाणारी कारणे मात्र संतापजनक आहेत. जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत, काही व्यापारी साठेबाजी करत आहेत, अशी कारणे पुढे करून सरकार जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु जेव्हा जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरतात, तेव्हा त्याचा थेट फायदा ग्राहकांना का दिला जात नाही, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. दर घसरले की महसूल वाढवण्यासाठी कर कायम ठेवले जातात आणि दर वाढले की त्याचा संपूर्ण बोजा जनतेवर टाकला जातो. केंद्राचा अबकारी कर आणि राज्यांचे मूल्यवर्धित कर हेच प्रत्यक्षात इंधनदरवाढीमागील मोठे कारण आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे कारण पुढे करून सरकार आपली नैतिक जबाबदारी टाळू शकत नाही. दुसरीकडे, साठेबाजी रोखण्याची जबाबदारी असलेल्या प्रशासनाचे अपयशही तितकेच गंभीर आहे. जर डिझेलचा कृत्रिम तुटवडा निर्माण होत असेल, तर पुरवठा आणि नियंत्रण यंत्रणा नेमकी काय करत आहे, हा सवाल उपस्थित होतो. पेट्रोल-डिझेलचे दर वाढले की केवळ वाहनधारकांनाच फटका बसत नाही, तर संपूर्ण बाजारव्यवस्थेचे गणित बिघडते. वाहतूक खर्च वाढल्यामुळे भाजीपाला, दूध, धान्य, बांधकाम साहित्य यांसह प्रत्येक वस्तू महाग होते. महागाईचे हे दुष्टचक्र अखेरीस सामान्य माणसाच्या स्वयंपाकघरावर घाव घालते. सरकार दरवाढीचा डोस हळूहळू देत आहे, जेणेकरून जनक्षोभ उसळू नये; पण हीच पद्धत अधिक घातक ठरत आहे. आधीच रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि घरखर्च यांच्या ओझ्याखाली दबलेल्या नागरिकांचे बजेट पूर्णपणे कोलमडत चालले आहे. विरोधकांकडून सरकारच्या आर्थिक धोरणांवर होत असलेली टीका केवळ राजकीय म्हणून फेटाळून लावता येणार नाही. कारण वास्तवात बाजारातील परिस्थिती आणि सामान्यांच्या जीवनातील संघर्ष हेच त्या टीकेला पुष्टी देत आहेत. आता सरकारने केवळ जागतिक परिस्थितीचे रडगाणे गाण्याऐवजी ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी महसुलाच्या हव्यासापेक्षा जनतेच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. इंधनावरील करांमध्ये कपात करणे, पेट्रोल-डिझेलला जीएसटीच्या कक्षेत आणणे आणि देशभरात समान दररचना निर्माण करणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर शेतीसाठी डिझेलचा स्वतंत्र कोटा राखीव ठेवून ग्रामीण भागातील टंचाई तातडीने दूर केली पाहिजे. शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष करणे म्हणजे देशाच्या अन्नसुरक्षेशी खेळ करण्यासारखे आहे. लोकशाही व्यवस्थेत सरकार हे जनतेचे विश्वस्त असते, मालक नव्हे. जनतेला महागाईशी जुळवून घेण्याचा सल्ला देणे हे लोककल्याणकारी राज्याचे लक्षण ठरू शकत नाही. सरकारने आपल्या धोरणात संवेदनशीलता आणि दूरदृष्टी दाखवून सामान्यांना दिलासा देण्याची हीच योग्य वेळ आहे. अन्यथा महागाईच्या आगीत धुमसणारा जनतेचा असंतोष भविष्यात सत्ताधाऱ्यांसाठी मोठे राजकीय संकट निर्माण करू शकतो.

# घरोघरी जनगणना कामकाजाला सुरुवात; बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची पाली येथे भेट

## अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

**भारताच्या १६ व्या राष्ट्रीय जनगणना २०२७ अंतर्गत १६ मे २०२६ पासून प्रत्यक्ष घरोघरी जाऊन जनगणना माहिती संकलनाच्या कामकाजाला सुरुवात झाली असून बीड जिल्ह्यात प्रशासनाच्या वतीने व्यापक स्तरावर जनगणना मोहीम राबविण्यात येत आहे . या पार्श्वभूमीवर नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे , असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.**

जनगणना ही देशाच्या विकास आराखड्याचा पाया मानली जाते . लोकसंख्या , शिक्षण , आरोग्य , शेती , रोजगार , पाणीपुरवठा , निवास , स्थलांतर , वाहतूक , डिजिटल सुविधा आणि विविध शासकीय योजनांचे नियोजन जनगणनेतील आकडेवारीवर आधारित असते . त्यामुळे प्रत्येक घरातील माहिती अचूक आणि संपूर्ण असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात जनगणना यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत असून निवासी उपजिल्हाधिकारी तथा जनगणना अधिकारी शिवकुमार स्वामी हे संपूर्ण कामकाजावर लक्ष ठेवून आहेत . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून जनगणना प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत . तालुका स्तरावर बीडचे तहसीलदार तथा तालुका चार्ज अधिकारी चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली जनगणना कामकाज सुरू असून अतिरिक्त चार्ज अधिकारी सुहास हजारे हे देखील कामकाजाचा आढावा घेत आहेत . महसूल सहाय्यक महादेव चौरे , विस्तार अधिकारी तुकाराम जाधव , सहाय्यक महसूल अधिकारी राहुल कसबे , ऑपरेटर गणेश सावंत , रोहित सोनवणे , महसूल सहाय्यक सरोजनी बोराडे , महसूल सेवक संभाजी शिंदे आदी अधिकारी व कर्मचारी जनगणना प्रक्रियेसाठी समन्वय आणि मार्गदर्शन करत आहेत. दरम्यान , बीडचे



तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी रविवारी (२४ मे ) पाली येथे प्रत्यक्ष भेट देऊन जनगणना कामकाजाची पाहणी केली . श्रीकांत अश्रुबा नवले , सी . एन . - १२३ , गणना घर क्रमांक ०१६५ येथे जनगणना सुरू होती . प्रगणक श्रीमती स्मिता जोशी यांनी प्रश्नावलीतील विविध प्रश्न विचारून कुटुंबाची माहिती संकलित केली . यावेळी तहसीलदार शेळके यांनी स्वतः कुटुंबीयांशी संवाद साधून माहितीची पडताळणी केली तसेच जनगणना प्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त केले. या पाहणीवेळी सहाय्यक महसूल अधिकारी राहुल कसबे , पर्यवेक्षक गणेश कदम तसेच प्रगणक श्री . पायके , युवराज जमदाडे , स्मिता जोशी , मीरा मोकाट , जगताप सुनीता , श्रीमती सांगळे आणि श्रीमती वैद्य उपस्थित होते . प्रशासनाच्या माहितीनुसार , दि . १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक प्रत्येक घरात जाऊन माहिती संकलित करणार आहेत . घराची रचना , कुटुंबातील सदस्यांची संख्या , शिक्षण , व्यवसाय , स्थलांतर , इंटरनेट वापर , वाहनांची संख्या , पाणीपुरवठा , स्वच्छता सुविधा , घरातील उपलब्ध साधने , इंधन वापर , सामाजिक आणि आर्थिक स्थिती यासंदर्भात विविध प्रश्न विचारले जाणार आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी तथा जनगणना अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितले की , '' जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून शासनाच्या भावी धोरणांची दिशा ठरविणारी प्रक्रिया आहे . प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे . '' उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नागरिकांना प्रगणकांना योग्य आणि सत्य माहिती देण्याचे आवाहन केले असून चुकीची अथवा अपूर्ण माहिती देणे टाळावे , असे स्पष्ट केले आहे .तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , '' जनगणना प्रक्रिया पूर्णपणे गोपनीय असून नागरिकांनी कोणतीही भीती किंवा संभ्रम न बाळगता प्रशासनाला सहकार्य करावे . शासनाच्या विविध योजनांचे भविष्यातील नियोजन जनगणनेतील माहितीवर आधारित असते . त्यामुळे प्रत्येक माहिती अचूक असणे आवश्यक आहे . '' जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अधिकृत ओळखपत्र असलेल्या प्रगणकांनाच माहिती द्यावी , कोणालाही ओ . टी . पी . अथवा बँकिंग माहिती देऊ नये तसेच कोणतीही शंका असल्यास तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा , असे आवाहन केले आहे .

# स्व.चंद्रसेन तांदळे यांना तिसऱ्या दिवशी वृक्ष लागवड व वृद्ध बेघरांना अन्नदान करुन आदरांजली

**बीड । प्रतिनिधी**

**'मातृभुमी प्रतिष्ठान'चे अध्यक्ष ,सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी आपल्या वडिलांच्या मृत्युपश्चात रुढी-परंपरा नाकारुन, दिनांक २४ मे २०२६ शनिवार रोजी तीस-या दिवशीच कृष्णाई नगर येथे वडाचे झाड लावून तसेच बीडस्थित बेघरांचे निराश्रीतांचे 'जिव्हाळा' केंद्रातील वृद्धांना अन्नदान करुन चळवळीतील आपल्या स्नेहिजनांसह कालवश वडिलांना आदरांजली अर्पण केल्याची माहिती त्यांचे चुलते प्राचार्य डी. जी. तांदळे यांनी दिली आहे.**

बीड जिल्हा भूविकास बँकेतून सेवानिवृत झालेले , मित्रनगर भागातील समता कॉलनीत स्थायीक , चंद्रसेन रंगनाथ तांदळे (मुळ गाव हिंगणी खुर्द ता.बीड) यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळी आजाराने दि २१मे रोजी दु:खद निधन झाले. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांचे ते वडिल होत. गावाकडील प्रथेप्रमाणे काल तिस-या दिवशी रक्षा विसर्जन केले.नंतर लगेच 'दशक्रिया' विधी कंकालेश्वर येथे पुर्ण केला. आणि, वृक्ष लागवड करून ,रात्री



शहरातील भाजी मंडई स्थित निराश्रित-बेघरांचे आश्रयस्थान 'जिव्हाळा' केंद्रातिल वृद्धांना अन्नदान करुन आपले वडिलांना आदरांजली वाहिली. या प्रसंगी प्रथम चंद्रसेन भाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.प्राचार्य डी. जी. तांदळे यांनी श्रद्धांजली वाहताना चंद्रसेन भाऊंचे शिक्षणप्रेमी,विवेकी,धीट,कर्मकांड-विरोधी स्वभाव वैशिष्टे कथन करुन डॉ. संजय तांदळे यांनी आपल्या वृद्ध आई-वडिलांच्या केलेल्या सेवा-सुश्रुषेचे तोंड भरुन कौतुक केले. संतवचनांचे उदा. देवून ''जीवंतपणी माता-पित्यांची सेवा,हीच इश्वर सेवा होय;''हे अधोरेखित केले. जिल्हा वाहतूक शाखेचे पी. एस. आय. विजय जाधवर, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पी. एस. आय. वसुदेव मिसाळ, से. नि. पी. एस.आय. बाबासाहेब जायभाये, से. नि. पोस्ट मास्तर एल. आर. चाटे,सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे,मीनाक्षी देवकते, भूविकास बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी सुदाम कोळेकर,से. नि. ऑडिटर त्रिंबक मुंडे,'जिव्हाळा'चे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापन राजू वंजारे,डॉ लक्ष्मण पवळ,प्राचार्य बाळासाहेब नागरगोजे हे प्रसंगोचीत व्यक्त झाले. शेवटी,डॉ संजय यांनी आपले वडिल अंधश्रद्ध नव्हते,विज्ञानवादी होते.त्यांचाच वसा घेवुन आम्ही वारसा जपत आहोत, नव्हे,अधिक सामाजिक बांधिलकीची जाण-भान ठेवून काम करीत आहोत;असे सांगून जून मध्ये पाऊस पडल्यानंतर गावी शेतात 'रक्षा' मध्ये वटवृक्ष लागवडीचा संकल्प जाहीर केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजू वंजारे सूत्रसंचालन अभिजीत वैद्य तर सहभोजनाचे नियोजन काळजीवाहक व्यवस्थापक छाया सरोदे हीने केले.

# जिल्हा १ हजार ८८५ विद्यार्थ्यांचे आरटीई अंतर्गत इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश निश्चित

**बीड । प्रतिनिधी**

**आर्थिक दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वांना शिक्षण हक्क (आरटीई) कायदा अंतर्गत व्यवस्था करण्यात आली आहे. आरटीई प्रवेशासाठी पहिल्या फेरीत १ हजार ८८५ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चितकरण्यात आले असून .प्रवेश घेण्याची अंतिम मुदत उलटल्यानंतरही ४५९ जागा रिक्त राहिल्या आहेत नव्या सुचनेनुसार २९ मे पर्यंत या रिक्त जागांवर प्रतीक्षा यादीतील प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे.अशी माहिती**



**शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.**

### बोगस प्रवेश रोखण्यात शिक्षण विभाग सपशेल अपयशी-मनोज जाधव

आरटीई अंतर्गत प्रवेश मिळावा यासाठी अनेक पालकांनी खोटी कागदपत्रे तयार करत मोफत प्रवेशांचा लाभ मिळवला आहे. या संदर्भात सक्षम पुरावे आढळले असून वेळोवेळी रीतसर तक्रार दिल्या आहेत. त्या अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने सखोल चौकशी करून आणि पडताळणी करून एकही बोगस प्रवेश होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे होते .

नियमित प्रवेशात २५ टक्के जागा आरटीई कायद्यातंर्गत राखीव ठेवण्यात येतात. जिल्ह्यात आरटीई प्रवेश प्रक्रियेत २१४ शाळांमध्ये २ हजार ४२५ जागा आरक्षित आहेत. यात पहिल्या टप्प्यात २ हजार ३६० विद्यार्थ्यांची निवड झाली होती . त्यातील १ हजार ८८५ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला असून बीड जिल्ह्यात सद्यस्थितीत ४५९ जागांसाठी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

## पान १ वरून...

### कांदा दराचा वांदा शेतकरी

चित्र आहे. अनेक शेतकरी संतप्त होऊन कांदा बाजारात फेकून देत असल्याच्या घटना देखील समोर येत आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी निषेध म्हणून कांदा रस्त्यावर टाकून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने कांद्याच्या वाढत्या दरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी निर्यातबंदी आणि निर्यात शुल्क लागू केले होते. मात्र याचा सर्वाधिक फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसल्याचे बोलले जात आहे. शेतकरी संघटनांच्या मते, ग्राहकांना स्वस्त कांदा मिळावा यासाठी सरकारने घेतलेल्या निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या मालाला बाजारच मिळेनासा झाला आहे. परिणामी व्यापाऱ्यांकडूनही अत्यल्प दराने खरेदी केली जात असून शेतकरी पूर्णपणे अडचणीत सापडला आहे. दरकपातीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना सरकारकडून आर्थिक मदत किंवा अनुदानाची अपेक्षा होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस घोषणा न झाल्याने उत्पादकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. कांद्याला हमीभाव द्यावा, निर्यात धोरण स्थिर ठेवावे आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने अनुदान जाहीर करावे, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

----------

### बीडमध्ये राजकीय नेत्याच्या

जीवे मारण्याची धमकी देखील दिल्याचं फिर्यादीने म्हटलं आहे. या घटनेनं जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. आरोपी अमर बांगर हा पीडित महिलेला सातत्याने ब्लॅकमेल करत होता. एवढेच नव्हे तर, त्याने महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेतला आणि तिच्यावर पाशवी अत्याचार केले. आरोपीचे कृत्य एवढ्यावरच थांबले नाही, त्याने पीडित महिलेला धमकावून तिच्याकडून आणि तिच्या कुटुंबाकडून मोठ्या प्रमाणावर पैशांची देखील मागणी केली. कुटुंबाची बदनामी होऊ नये म्हणून पीडितेच्या कुटुंबाने आरोपीला मोठ्या प्रमाणात पैसा दिला, मात्र त्यांचा छळ थांबला नाही, असे फिर्यादीत म्हटले आहे. आरोपीच्या त्रासाला कंटाळून पीडितेने अखेर पोलिसांत न्याय मागितला आहे. आरोपी अमर बांगर हा बीड जिल्ह्यातील मोठ्या राजकीय पुढाऱ्यांच्या जवळचा आणि पंचायत समितीच्या माजी सभापतींचा मुलगा असल्याने या प्रकरणाला राजकीय वळण लागले आहे. शिवाजीनगर पोलिसांनी याप्रकरणी बलात्कार, खंडणी आणि गुंगीचे औषध देऊन शोषण करणे या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपीच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत. मात्र, आरोपीच्या वडिलांची राजकीय पार्श्वभूमी पाहता पोलीस किती तत्परतेने कारवाई करतात याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.दरम्यान, राज्याच्या राजकारणात आणि गुन्हेगारीत गेल्या काही महिन्यात बीड जिल्हा केंद्रस्थानी राहिला आहे. त्यामध्ये, राजकीय नेत्यांच्या वरदहस्तानेची बीडमध्ये गुन्हेगारी वाढत असल्याचे अनेक प्रकरणांवरुन दिसून आले आहे. त्यातच, आता एका राजकीय नेत्याच्या मुलाचा हा प्रताप समोर आल्याने बीडमध्ये खळबळ उडाली असून पीडितेला न्याय मिळेला का, याचीच चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

---------------

### १२ खासदारांना 'संसदरत्न' सन्मान

अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ पर्यंतच्या संसदीय कामगिरीच्या आधारे ही निवड करण्यात आल्याचे प्रियदर्शनी राहुल यांनी स्पष्ट केले. यंदा उत्कृष्ट कामगिरीबद्दल ४ संसदीय स्थायी समित्यांनाही संसदरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये चरणजीत सिंह चन्नी यांच्या अध्यक्षतेखालील कृषी समिती, भर्तृहरी महताब यांच्या अध्यक्षतेखालील वित्त समिती, सप्तगिरी शंकर उल्का यांच्या अध्यक्षतेखालील ग्रामीण विकास आणि पंचायती राज समिती तसेच अनुराग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखालील कोळसा आणि खाण समितीचा समावेश आहे. संसदरत्न पुरस्काराची स्थापना २०१० मध्ये चेन्नईस्थित 'प्राइम पॉइंट फाऊंडेशन' या स्वयंसेवी संस्थेने माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार केली होती. २०१० मध्ये झालेल्या पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटनही डॉ. कलाम यांनी केले होते. मागील १५ पुरस्कार सोहळ्यांमध्ये खासदार आणि समित्यांना एकूण १४३ पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. १६ वा संसदरत्न पुरस्कार सोहळा जुलै २०२६ मध्ये नवी दिल्ली येथे होणार आहे.

-----------

### शेतकऱ्यांना साठेबाज ठरवून

असल्याचा सरकारचा दावा असेल, तर एकतरी साठा जप्त झाला आहे का? याचे उत्तर सरकारने द्यावे. जर साठेबाजी होत नसेल, तर पुरवठा विभाग झोपला आहे का? असा सवालही त्यांनी केला. जालना जिल्ह्यात डिझेल विक्रीसंदर्भात काढण्यात आलेल्या आदेशावरही त्यांनी निशाणा साधला. ट्रॅक्टरची कागदपत्रे आणि नोंदणी क्रमांक दाखवल्याशिवाय कॅनमध्ये डिझेल देऊ नये, असा आदेश प्रशासनाने दिल्याचा उल्लेख करत त्यांनी संताप व्यक्त केला. नांगरणीसाठी भाड्याने ट्रॅक्टर आणणाऱ्या गरीब शेतकऱ्यांनी मग डिझेल कुठून आणायचे, याचे उत्तर सरकारकडे नाही, असे ते म्हणाले. जनतेच्या हातातील गाड्या हिरावून घेऊन त्यांच्या हातात हातगाड्या देणे, हाच या सरकारचा मास्टरस्ट्रोक दिसतोय, असा टोला लगावत दानवेंनी सरकारवर सडकून टीका केली. दरम्यान, पेरणीपूर्व काळात डिझेल उपलब्धता, इंधनसाठा आणि प्रशासनाच्या निर्बंधांमुळे ग्रामीण भागात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, विरोधकांनी सरकारच्या धोरणांवर हल्लाबोल सुरू केला आहे.

---------------

### मोटेगावकरचे पुण्यात

तपास यंत्रणांनी केलेल्या प्राथमिक तपासात शिवराज मोटेगावकर याने पुण्यात मोक्याच्या ठिकाणी मोठी गुंतवणूक केल्याचे उघड झाले आहे. मोटेगावकर याने २०२३ मध्ये पुण्यातील हवेली तालुक्यातील वारजे या अत्यंत हाय-प्रोफाइल आणि मोक्याच्या परिसरात तब्बल ५१ गुंठे जमीन खरेदी केल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट झाले आहे. सध्याच्या चालू बाजारभावानुसार या जमिनीची किंमत सुमारे ३० ते ४० कोटी रुपयांच्या घरात असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, ही जमीन एका सामाजिक संस्थेच्या नावाने खरेदी करण्यात आली होती. घोटाळा उघडकीस आल्यानंतर या जमिनीच्या फलकावर मोटेगावकरचे नाव काळ्या रंगाने झाकण्याचा प्रयत्न झाल्याचेही समोर आले आहे.सीबीआयने मोटेगावकरला अटक केल्यानंतर आता ईडीने या संपूर्ण प्रकरणात पैशांचा मागोवा घेण्यासाठी मनी लाँड्रिंग कायद्यांतर्गत चौकशी सुरू केली आहे. कोचिंग क्लासेसच्या नावाखाली की थेट पेपरफुटीच्या काळ्या पैशातून ही मालमत्ता उभी करण्यात आली, याचा शोध घेतला जात आहे. मोटेगावकर आणि त्याच्या जवळच्या नातेवाईकांच्या बँक खात्यांचे तपशील मागवण्यात आले असून, संशयास्पद व्यवहारांची पडताळणी केली जात आहे. नीट परीक्षेपूर्वी पालकांकडून प्रश्नसंच पुरवण्याच्या नावाखाली किती कोटी रुपये उकळण्यात आले, याचाही सविस्तर तपास सुरू आहे.पुणे महानगरपालिकेनेही मोटेगावकरच्या जे. एम. रोडवरील क्लासेसच्या इमारतीवर थकीत कर आणि अनधिकृत बांधकामापोटी सील ठोकण्याची कारवाई केली आहे.

-------------

### पाऊस पडताच पेरणी

गेल्यावर्षी परिस्थिती फार वेगळी होती. १५ मे ते ३० मे या कालखंडात फार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात पाऊस झाला होता. यावर्षी तशा प्रकारची परिस्थिती नाहीय. शेतकऱ्यांना एवढंच आवाहन करतो की, साधारण ७५ ते १०० मिमी पाऊस पडल्याशिवाय पेरण्या करु नये, असं आवाहन डॉ. कैलास डाखेरे यांनी केलं. एका वृत्तवाहिनीला त्यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली. दरम्यान, राज्यात वातावरणाती काय परिस्थिती आहे ते देखील सविस्तर जाणून घेऊयात.राज्यातील काही भागांमध्ये मान्सून पूर्व पावसाने हजेरी लावली आहे. वादळी वाऱ्यामुळे यावेळी काही ठिकाणी शेतीचंदेखील नुकसान झालं आहे. कोकणाच्या तीन जिल्ह्यांमध्ये मान्सून पूर्व पावसाने हजेरी लावली आहे. सिंधूदुर्ग जिल्ह्यात सर्वच भागांत आज विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडागडाटासह पाऊस पडला. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथे जोरदार मुसळधार पाऊस पडला. तर रायगड जिल्ह्यात मानगाव येथे मुसळधार पाऊस पडला आहे. इथे सकाळपासून ढगाळ वातावरण होतं.हिंगोली जिल्ह्याच्या वसमत तालुक्यात वादळी पावसाने धुमाकूळ घातला. जोरदार वाऱ्यामुळे शेतातील पीकं अक्षरश: जमीनदोस्त झाली आहेत. केळीची बाग उद्ध्वस्त झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या तोंडचा घास गेला आहे. नांदेडमध्येही वादळी पावसामुळे शेतीचं नुकसान झालं आहे. मालेगावातही वादळी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचा कांदा भिजला आहे.एकीकडे राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी पाऊस पडतोय. काही ठिकाणी ढगाळ वातावरण आहे. असं असताना विदर्भात सूर्य अक्षरश: आग ओकतोय अशी परिस्थिती आहे. विदर्भातील अमरावती, चंद्रपूर आणि वर्धा या तीन जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. दुसरीकडे नागपूर, यवतमाळ, गडचिरोली, अकोला या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

----------------

### दहा महिन्यांत मोदी

असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, नागपूर एक लॉजिस्टिक हब म्हणून पुढे येत आहे. आज गोदाम लॉजिस्टिक पार्क याचा उद्घाटन केलेला आहे. अतिशय स्टेट ऑफ आर्ट अशा प्रकारची फॅसिलिटी तयार झालेली आहे. शंभर एकरहून जास्त जागेवर हे काम करण्यात आलेलं आहे आणि उद्योगाच्या क्षेत्रामध्ये, लॉजिस्टिकमध्ये, मॅन्युफॅक्चरिंगमध्ये खूप मोठा फायदा हा नागपूरला होणार आहे. गेल्या काही काळात जी लॉजिस्टिक पॉलिसी तयार केली आहे, त्याच्यामुळे नागपूर हे देशातला एक मोठे लॉजिस्टिक हब होत आहे. मोठ्या प्रमाणात लॉजिस्टिक पार्क तयार होत आहे आणि यामुळे लॉजिस्टिकची कॉस्ट कमी होणार आहे. आपल्याला जर ग्लोबल सप्लाय चैनचा भाग व्हायचा असेल, तर लॉजिस्टिक कॉस्ट कमी करणे हे महत्त्वाचं आहे आणि तेच काम आज या माध्यमातून करत आहोत असे मुख्यमंत्री म्हणाले.दरम्यान, ''आता काम वेगाने करणं अत्यंत महत्त्वाचं आहे आणि ते अतिशय वेगाने काम झालेलं आहे. विशेषता समृद्धीचं एक्सटेन्शन आहे, यामुळे संपूर्ण पूर्व विदर्भ हा औद्योगिकदृष्ट्या अतिशय पुढारलेला होईल आणि त्यातून लॉजिस्टिकची कॉस्ट अतिशय कमी होईल. तसंच रोजगाराची निर्मिती खूप मोठ्या प्रमाणात होणार आहे, लॉजिस्टिक पार्कमध्ये सर्वात मोठा रोजगार असतो, त्यामुळे रोजगाराची संधी उपलब्ध झाली पाहिजे हा आमचा प्रयत्न आहे,'' असंही मुख्यमंत्री म्हणाले.

----------------

### ९४% फॉलोअर्स भारतीयच...!

खळबळ उडवून दिली आहे. भाजपचे आरोप खोडून काढताना अभिजीत दिपके यांनी 'एक्स' वर त्यांच्या अकाउंटच्या ॲनालिटिक्सचा एक स्क्रीनशॉट शेअर केला. ''आमचे अकाउंट हॅक होण्यापूर्वी आम्ही मीडियासोबत शेअर केलेल्या ऑडियन्स डेमोग्राफिक्सचे हे स्क्रीन रेकॉर्डिंग आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना दिपके यांनी थेट प्रश्न केला की, ''आमचे ९४ टक्क्यांहून अधिक फॉलोअर्स भारतातीलच आहेत. मग असे असताना केंद्रीय मंत्री किरण रिजिजू देशातील तरुणांना पाकिस्तानी असे का म्हणत आहेत?'' केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी 'कॉकरोच जनता पार्टी'वर कडाडून टीका केली होती. त्यांनी 'एक्स' वर लिहिले होते की, ''सोशल मीडियावरील आपले फॉलोअर्स पाकिस्तान आणि जॉर्ज सोरोस गँगमध्ये शोधणाऱ्यांची मला दया येते.'' दुसरीकडे, भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री सुकांत मुजुमदार यांनीही या प्लॅटफॉर्मला मिळणारा प्रतिसाद हा पाकिस्तानमधून असल्याचा दावा केला. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, ''कॉकरोच जनता पार्टीचे सोशल मीडियावरील ४९ टक्के फॉलोअर्स पाकिस्तानमधील आहेत, तर केवळ ९ टक्के फॉलोअर्स भारताचे आहेत.'' असे ते म्हणाले होते. त्यावर सीजेपी प्रमुखांकडून आलेले उत्तर हे टीकाकारांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहे.

-------------

### मोटेगावकरांचा विद्यार्थ्यांवर

प्रकारावर आक्षेप घेतला आहे.शैक्षणिक क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवला पाहिजे, त्याठिकाणी असे काम आणि अंधश्रद्धेचे प्रकार घडत असतील तर याचा जाहीर निषेध महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती करते, अशी प्रतिक्रिया माधव बावगे यांनी दिली. तसेच पोलिसांनी याची कसून चौकशी करावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. दुसरीकडे आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनीही ट्विट करुन प्रश्न विचारला आहे. मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिवराज मोटेगावकर यांनी ''मंतरलेले पाणी शिंपडले. मग हे नेमकं अशोक खरात यांच्या ''उष्णो जल''च्या दाव्यांपेक्षा वेगळं कसं? जेव्हा अंधश्रद्धा हा व्यवसाय बनतो आणि मोठ्या लोकांशी ओळखी हे संरक्षणाचं कवच बनतं, तेव्हा त्याची किंमत सामान्य जनतेला मोजावी लागते. चमत्कारांचे दावे करणारी व्यक्ती तरुणांच्या विचारविश्वाला दिशा देण्याच्या भूमिकेत असू नये. दैवी उपचारांचे दावे असोत, श्रद्धेचे शोषण असो किंवा सत्तेचा गैरवापर असो,उपाय एकच आहे, निष्पक्ष चौकशी, आणि सर्वांसाठी समान न्याय, असे विजय कुंभार यांनी म्हटलं आहे. त्यामुळे, आता या व्हायरल व्हिडिओवरुन मोटेगावकरवर कारवाई होती का, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

----------------

### तरुण पिढीचा अनोखा

आणि तरुणांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरून सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रियता मिळवली. अवघ्या काही दिवसांतच त्यांचे लाखो फॉलोअर्स वाढले, ज्याने अनेक प्रस्थापित राजकीय पक्षांच्या डिजिटल पी आरटीमचे रेकॉर्ड्स मोडीत काढले.या डिजिटल वाढत्या प्रभावामुळे आणि प्रस्थापित राजकारणावर केलेल्या सडकून टीकेमुळे अनेक राजकीय वर्तुळातून यावर आक्षेप घेण्यात आले. परिणामी, 'कॉकरोच जनता पार्टी'चे मुख्य सोशल मीडिया खाते ब्लॉक (गुठमळून) करण्यात आले आहे.खाते ब्लॉक झाले असले तरी तरुणांचा उत्साह कमी झालेला नाही. ''आमचे खाते ब्लॉक करू शकता, पण सुशिक्षित बेरोजगारांचे विचार आणि आमचा आवाज कसा ब्लॉक करणार?'' असा सवाल आता या मोहिमेत सामील असलेले तरुण विचारत आहेत.प्रस्थापित पक्षांनी या 'कॉकरोच जनता पार्टी'ची खिल्ली उडवण्याऐवजी, त्यामागील तरुणांची निराशा आणि बेरोजगारीची दाहकता समजून घेणे हीच काळाची गरज आहे. अन्यथा, हा डिजिटल विद्रोह उद्या मतपेटीतून नवा चमत्कार घडवल्याशिवाय राहणार नाही, हे मात्र नक्की! हा काही पक्ष नाही मात्र यामुळे तरुण वर्ग किती आक्रमक आहे आणि नोकरी मिळत नसल्याने तो किती अडचणीत आहे याचे हे एक ज्वलंत उदाहरण म्हणावे लागेल देशभरामध्ये अनेक सुशिक्षित बेरोजगार करून आजही नोकरीच्या शोधामध्ये आहे राज्यात राज्यात बाहेर आणि देशभरामध्ये हे तरुण हातात डिग्र्या घेऊन नोकरीचा शोध घेत आहेत मात्र त्यांना डिग्री असूनही नोकरी मिळत नाही आणि नोकरी नसल्यामुळे पुढचे अनेक प्रश्न त्याच्यासमोर उभे आहेत त्यातूनच हा काल्पनिक म्हणा परंतु या तरुणांना आणि त्यांच्या भावनांना वाचा फोडणारा कॉक्रोज जनता पार्टी हा सोशल मीडियावरील पक्ष याची साक्ष देतो की नोकरीला पाहून तरुणांमध्ये किती रोष सरकार विरोधी आहे ते यातून दिसते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २५ मे २०२६





बीड : येथे नगर परिषद कर्मचाऱ्यांकडून वृद्ध शेतकरी महिलेचा भाजीपाला कचरा गाडीत टाकल्याच्या घटनेनंतर युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी पीडित जनाबाई दळवी यांची भेट घेऊन आर्थिक मदत करत धीर दिला. यावेळी राजू जोगदंड, प्रभाकर चांदणे, अविनाश जोगदंड, विलास मोमीन, के.के. कांबळे, धम्मा पारवेकर आदी उपस्थित होते.

## मुक्ताई लॉन्स जवळील चौकाचे जिजाऊ नगर नामकरण

बीड । प्रतिनिधी

शहरातील बार्शी रोडवरील मुक्ताई चौक रेणू हॉस्पिटल समोर, स्वराज्याच्या राजमाता जिजाऊ मासाहेब नगराचे नामांकन उद्घाटन सोहळा जिल्हा भाजपा उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ नेतेनवनाथ अण्णा शिराळे यांच्या हस्ते शुभारंभ करून झाला




यावेळी भाजपा नगरसेवक गोविंद शिराळे, राष्ट्रवादीचे युवा नेते झुंजार धांडे, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष किशोर राऊत, काकडे साहेब, नाईकवाडे साहेब, विराज मेडिकलचे सतीश पैठणे,ईश्वर राऊत, मुन्ना नाईक, अमोल जाधव, पोखरीचे गणेश भोंगाने, घाडगे गॅरेज, दादासाहेब नाईक ,विशाल राऊत, बिडवे,राजू घाडगे, बप्पा धांडे, नागोराव काकडे, कोर्ट बेलीफ काकडे साहेब, दीपक पिंगळे, दीपक कदम, विक्रम काळे, गोविंद टाकळकर, शिवालय मेडिकल अनंता गुंडेकर , परमेश्वर शिराळे, किशोर शेरकर , डॉक्टर काळे, प्रवीण चव्हाण, कृष्णा दादा शिराळे तसेच जिजाऊ नगर कॉलनी येथील तसेच बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर ,वकील ,प्राध्यापक व्यावसायिक यांची उपस्थिती होती.



## ह.भ.प. रघुनाथराव शेळके महाराजांना आष्टीत भावपूर्ण आदरांजली

आष्टी । प्रतिनिधी

मराठी भाषा, संत साहित्य, अध्यात्म आणि समाजप्रबोधन यांचा अखंड ध्यास घेत आयुष्यभर ज्ञानसेवा करणारे कै. ह.भ.प. रघुनाथराव शेळके महाराज यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आष्टी शहरात अत्यंत भावपूर्ण वातावरणात कृतज्ञता सोहळा संपन्न झाला. श्रद्धा, भक्ती, संस्कार आणि स्मृतींनी भारावलेल्या या कार्यक्रमाला अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून शेळके महाराजांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले.

आष्टी शहरातील सुप्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ. संतोष शेळके यांचे वडील असलेले कै. रघुनाथराव शेळके महाराज हे केवळ वारकरी संप्रदायातील एक निष्ठावंत प्रवचनकार नव्हते, तर मराठी साहित्याचे गाढे अभ्यासक, संतवाङ्मयाचे ज्ञाता आणि परमार्थाच्या मार्गावर आयुष्य वेचणारे एक विद्वान व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन ज्ञानदान, संस्कार, अध्यात्म आणि समाजप्रबोधनासाठी समर्पित केले होते. त्यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रमात वातावरण अत्यंत भक्तिमय आणि भावनिक झाले होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून शेळके महाराजांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या साध्या, सात्त्विक आणि अभ्यासपूर्ण जीवनकार्याचा गौरव केला. यावेळी सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज यांचे सुश्राव्य व प्रबोधनात्मक कीर्तन संपन्न झाले. आपल्या ओजस्वी वाणीतून त्यांनी संत परंपरेचा संदेश देत समाजात संस्कार, सेवा आणि अध्यात्म जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या कीर्तनामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते. या सोहळ्यास लाला महाराज राक्षे, रवींद्र महाराज तवले, नानासाहेब महाराज तवले, बाळासाहेब महाराज झगडे, नानासाहेब भोगाडे महाराज यांच्यासह विविध भागातील संत-महंतांनी उपस्थित राहून कै. शेळके महाराजांच्या पारमार्थिक कार्याला उजाळा दिला. संत साहित्य आणि वारकरी परंपरेतील त्यांच्या योगदानाचे यावेळी विशेष स्मरण करण्यात आले.

कार्यक्रमाला सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनीही मोठ्या आत्मीयतेने उपस्थिती दर्शवली. ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे तसेच पत्रकार शरद रेडेकर यांनी शेळके परिवाराचे सांत्वन करत महाराजांच्या विद्वत्तेच्या, अभ्यासू वृत्तीच्या आणि समाजाभिमुख कार्याच्या आठवणींना उजाळा दिला.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, कै. रघुनाथराव शेळके महाराज हे मराठी भाषेवर नितांत प्रेम करणारे व्यक्तिमत्त्व होते. संत साहित्याचा त्यांनी केवळ अभ्यासच केला नाही, तर आपल्या विचारातून आणि वर्तनातून त्याची शिकवण समाजात रुजवण्याचे काम केले. त्यांचे जीवन हे साधेपणा, प्रामाणिकपणा आणि परमार्थ यांचे जिवंत उदाहरण होते.

# माजलगाव तालुक्यात अवकाळीचा कहर !

## लऊळ, लहामेवाडी, शिंदेवाडी,टालेवाडी परिसरात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील लऊळ, लहामेवाडी, शिंदेवाडी टालेवाडी परिसरात दि २३ मे शनिवार रोजी सायंकाळच्या सुमारास निसर्गाने अचानक रौद्ररूप धारण करत जोरदार वादळी वाऱ्यासह काही ठिकाणी गारांचा पाऊस कोसळला. अवकाळी पावसामुळे शेतकरी आणि नागरिकांची मोठी तारांबळ उडाली असून अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे उन्मळून पडली तर शेतकऱ्यांचे सोलर, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. तर नागरिकांच्या घरावरील पत्रे उडून गेल्याचे समजते.









### मोठमोठी झाडे उन्मळून पडली, सोलार,पिकांचे नुकसान,घरांवरील पत्रे उडाली

माजलगाव तालुक्यातील लऊळ, शिंदेवाडी, लहामेवाडी,टालेवाडी परिसरात दि २३ मे शनिवार रोजी सायंकाळी वातावरणात अचानक बदल होऊन काळे ढग दाटून आले. त्यानंतर काही मिनिटांतच जोरदार वादळी वाऱ्यास सुरुवात झाली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे उन्मळून पडली तर काही ठिकाणी घरांवरील पत्रे उडून गेली.काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्याची माहिती आहे.पावसामुळे नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी धाव घेतली.या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. शेतातील सोलार पंप व उभी पिके वाऱ्यामुळे आडवी पडली असून भाजीपाला, आंबा फळबागा तसेच इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांवर या नैसर्गिक संकटामुळे दुहेरी आघात झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी नुकतीच पेरणीपूर्व मशागत केली असताना झालेल्या गारपिटीमुळे चिंता वाढली आहे. वादळी वाऱ्यामुळे काही भागात विजपुरवठाही खंडित झाल्याचे सांगण्यात येत आहे.अचानक आलेल्या या संकटामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना आर्थिक मदत द्यावी,अशी मागणी लाहामेवाडी,टालेवाडी, शिंदेवाडी व लऊळ परिसरातील शेतकऱ्यांतुन होत आहे.

## शिरूर तालुक्यातील शिरापूर धुमाळ व हिवरसिंगा गावाला वादळी वाऱ्याचा फटका; तहसीलदार सुरेश घोळवे यांची नुकसानग्रस्तांना भेट

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील पूर्व भागातील काही गावाला शनिवारी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे मोठा फटका बसला आहे. मोठमोठी झाडे उनमळून पडली आहेत तर अनेकांच्या घरावरील पत्रे उडून जाण्याच्या घटना घडल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अनुषंगाने आज रविवार दि. २४ मे रोजी शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी आपल्या प्रशासकीय फौज फाट्यासह तालुक्यातील शिरापूर धुमाळ, हिवरसिंगा या गावांना भेटी देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली आहे. गावातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील काही बांधावर असणारी झाडे उन्मळून पडलेली आहेत. गावात व वस्तीत राहणाऱ्या एकूण ११ जणांच्या घरावरील पत्रे उडाल्याने घराच्या




भिंतींना मोठे-मोठे तडे पडल्याने अंशतः नुकसान झाले आहे. तसेच मोसंबी व आंबा पिकांचे प्रत्येकी अर्धा एकर नुकसान झाले आहे. याशिवाय हिवरसिंगा येथे काही घरावरील पत्रे उडून गेली आहेत. शिरापूर धुमाळ ह्या एकाच गावातील शिवारात महाराष्ट्र विद्युत वितरण विभागाचे जवळपास ५० पोल कोलमडले आहेत. या मुळे विद्युत वितरणाचा मोठा खोळंबा झाला आहे. ही सर्व घटनास्थळांची पाहणी करून प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदार घोळवे यांनी दिले आहेत. या तहसीलदारांच्या दौऱ्यामध्ये मंडळाधिकारी शहादेव सानप, ग्राम महसूल अधिकारी अनिता मिसाळ, ग्रामपंचायत अधिकारी अमोल सानप, पोलीस पाटील अशोक पिंगळे आदीची उपस्थिती होती.

### विद्युत वितरणाची तत्परता

तालुक्यातील वादळी वाऱ्याने विद्युत वितरणाचा मोठा खोळंबा झाला असून महाराष्ट्र विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता महेंद्र निकम, वरिष्ठ तंत्रज्ञ महादेव बनकर, अरविंद धनवे व अमोल विटकर यांनी तातडीने नुकसानीची पाहणी करून दुरुस्तीची कार्यवाही सुरू करून मोठी तत्परता दाखवली आहे.

### नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रयत्न करणार

वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या घरावरील पत्रे उडल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळावी यासाठी कर्मचाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले असून, शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी दैनिक राज्य लोकतंत्रशी बोलताना दिली आहे.

## साधन व्यक्तींना नियमित काम देण्याच्या मागणीचे रोहयो मंत्री गोगावले यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय मुंबई अंतर्गत निवड झालेल्या साधन व्यक्तींना नियमित स्वरूपाचे काम उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी बीड जिल्ह्यातील साधन व्यक्तींनी रोजगार हमी योजना मंत्री नामदार भरत शेट गोगावले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप , गणेश काळे, बाजीराव ढाकणे, रज्जाक शेख शरद बारहाते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या पदभरती जाहिरातीनुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेसाठी बीड जिल्ह्यातून १०० साधन व्यक्तींची निवड करण्यात आली होती. तर राज्यभरात ३४०० साधन व्यक्तींची निवड सन २०२३ मध्ये झाली आहे. मात्र निवडी होऊनही अडीच ते तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. तरीही या साधन व्यक्तींना



तीन वर्षांत केवळ सात महिन्यांचेच काम देण्यात आले असून उर्वरित काळात बेरोजगारीची वेळ त्यांच्यावर आली आहे.

यावेळी बोलताना बाजीराव ढाकणे यांनी सांगितले की, सामाजिक अंकेक्षण ही शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांच्या पारदर्शकतेसाठी महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे ही प्रक्रिया सातत्याने राबवून निवड झालेल्या साधन व्यक्तींना नियमित काम उपलब्ध करून द्यावे. तसेच शासनाच्या विविध विभागांतील योजनांचे मूल्यांकन आणि सामाजिक अंकेक्षणाची जबाबदारीही या साधन व्यक्तींमार्फतच होणं गरजेचं आहे, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी मंत्रालय, मुंबई अंतर्गत निवड झालेल्या साधन व्यक्तींमार्फत प्रत्येक जिल्ह्यात विविध लोककल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण प्रभावीपणे राबविणे शक्य आहे. त्यामुळे शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन साधन व्यक्तींना बेरोजगार होऊ देऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर श्री बाजीराव ढाकणे, गणेश काळे , रज्जाक शेख, शरद बारहाते यांच्यासह साधन व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पान ६ वरुन...

### बळीराम निर्मळ हत्या

नियुक्ती करण्यात आली होती. सरकारी पक्षाच्या वतीने एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये फिर्यादी कांताबाई निर्मळ, जखमी केशरबाई निर्मळ, घटनास्थळ पंच, वैद्यकीय अधिकारी तसेच तपास अधिकारी यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. सरकारी पक्षाने सादर केलेल्या भक्कम पुराव्यांवरून आरोपी रोहिदास निर्मळ याने बळीराम निर्मळ यांची हत्या केली तसेच केशरबाई निर्मळ यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करून कांताबाई निर्मळ यांना गंभीर जखमी केल्याचे न्यायालयात सिद्ध झाले.

न्यायालयाने आरोपी रोहिदास निर्मळ यास कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व पाच हजार रुपये दंड, कलम ३०७ अंतर्गत दहा वर्षांची शिक्षा व दोन हजार रुपये दंड, तर कलम ३२६ अंतर्गत तीन वर्षांची शिक्षा व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. तसेच आरोपी विठ्ठल व कौसाबाई यांना सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करण्यात आले.या खटल्यात विशेष सरकारी वकील ॲड. मिलिंद वाघीरकर यांना ॲड. संदीप जोगदंड, ॲड. सोंडगे तसेच विधी विद्यार्थी अभिषेक अवताडे पैरवी अधिकारी गव्हाणे यांचे सहकार्य लाभले.

### बीड जिल्हा विकासाच्या

प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. परंतु, जिल्ह्यात सिंचनाचे क्षेत्र अत्यंत कमी आहे. अनेक जलसिंचन प्रकल्प वर्षानुवर्षे रखडलेले आहेत. पाऊस पडला तर शेती, नाहीतर दुष्काळ, असे चक्र दरवर्षी फिरत असते. सिंचनाची योग्य सोय नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून, जिल्ह्यातील शेतमजूर आणि ऊसतोड कामगारांचे स्थलांतर रोखण्यात सर्वच राजकीय पक्ष अपयशी ठरले आहेत.पोकळ आश्वासने आणि जातीचे राजकारणनिवडणुका आल्या की सर्वच पक्षांचे नेते बीडच्या विकासाच्या गप्पा मारतात. जाहीरनाम्यांमध्ये चांगल्या शिक्षणाचे, आरोग्याचे आणि उद्योगांचे गाजर दाखवले जाते. प्रत्यक्षात मात्र कृती शून्य असते. ऐन मतदानाच्या वेळी विकासाचे मुद्दे बाजूला सारून जातीचे राजकारण खेळले जाते. जनतेच्या भावना भडकावून, गोड बोलून मते पदरात पाडली जातात. पण निवडून आल्यानंतर पुढील पाच वर्षे जनतेच्या पदरी फक्त निराशाच पडते.बीडकरांचा सवाल: चांगल्या सुविधा कधी मिळणार?जिल्ह्यातील सामान्य जनता आता विचारू लागली आहे की, आम्हाला चांगले शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधा, सिंचनाचे पाणी आणि हक्काचा रोजगार कधी मिळणार? केवळ भाषणे आणि आश्वासने देऊन बीडचा विकास होणार नाही. जर बीड जिल्ह्याला गुन्हेगारीच्या गर्तेतून बाहेर काढून प्रगतीच्या पथावर न्यायचे असेल, तर राजकारण्यांना पोकळ गप्पा सोडून प्रत्यक्ष जमिनीवर काम करावे लागेल, हीच आजच्या घडीला बीडकरांची मुख्य मागणी आहे.

### युसूफवडगांव व परिसरात

खांब आणि तारा जागोजागी तुटून पडल्यामुळे या भागातील दोन महत्त्वाची वीज उपकेंद्रे पूर्णपणे बंद पडली होती.रस्त्यांवर पडलेल्या झाडांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण झाले होते.

आमदार नमिता मुंदडा यांनी केजचे तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांना तातडीने बाधित गावांचा दौरा करून परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे निर्देश दिले होते.त्यामुळे रविवार सकाळीच संबंधित सर्व विभागांनी घटनास्थळी दाखल होऊन शेती पिके, फळबागा, घरे आणि वीज यंत्रणेच्या झालेल्या नुकसानीचे अचूक पंचनामे सुरू केले,वादळग्रस्त नागरिकांना आणि शेतकऱ्यांना शासनाकडून त्वरित आणि जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### आष्टी परिसरात दुचाकीवरून

वस्त्या आणि रेकॉर्डवरील हिस्ट्रीशीटर (गुन्हेगार) चेक केले. तसेच परिसरातील १०० पेक्षा जास्त सिसिटिव्ही (उउढत) फुटेजची अत्यंत बारकाईने पडताळणी केली.

गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून पडली पहिली पकड

उउढत फुटेजमधील संशयितांचे वर्णन आणि गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, २३ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, फुटेजमधील एक संशयित विकास भोसले हा सध्या त्याच्या चिखली (ता. आष्टी) येथील राहत्या घरी आला आहे. पथकाने तात्काळ तिथे छापा टाकून विकास भोसले याला ताब्यात घेतले.

दाजी-मेव्हण्याची जोडी निघाली चोर

पोलिसी खाक्या दाखवताच विकास भोसले याने हा गुन्हा त्याचा दाजी अरुण बप्पा काळे (रा. बोलेगाव, जि. छ. संभाजीनगर) याच्यासोबत मिळून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी तात्काळ आष्टी पोलिसांच्या मदतीने दुसऱ्या आरोपीलाही ताब्यात घेतले. या दोघांकडे सखोल विचारपूस केली असता, त्यांनी बीड जिल्ह्यात चैन स्नॅचिंगचे ३ गुन्हे केल्याचे मान्य केले. आरोपींना पुढील तपासासाठी आष्टी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, त्यांच्याकडून आणखीही अनेक गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

या पथकाने केली धडाकेबाज कामगिरी

सदरची कौतुकास्पद कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, आष्टी उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक बाळकृष्ण हनपुडेपाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, आणि आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, अर्जुन यादव, पोलीस अंमलदार आशपाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे तसेच आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिंदे, प्रवीण क्षीरसागर, सत्यवान वाणी, तागड, तांबे आणि चालक सिद्धेश्वर मांजरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### बीड येथे गेवराई मतदारसंघातील

शिंदे, जिल्हा संघटक विक्रमराजे भोसले, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, तालुकाप्रमुख उद्धव मडके, शहर प्रमुख मुकेश महाजन, युवासेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, युवासेना तालुकाप्रमुख बिभीषण मोघे, व्हीजेएनटी तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर, गणेश पवार, राजेंद्र क्षीरसागर, स्वप्निल आबुज यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिलेला शब्द पाळणारे नेतृत्व; माजी आ. भीमराव धोंडे यांच्या भरीव मदतीने पुन्हा रंगली आष्टीच्या राजकारणाची चर्चा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील राजकारणात पुन्हा एकदा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. कारण, निवडणुकीत किंवा राजकीय सभांमध्ये केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृतीतून शब्द पाळणारे नेतृत्व म्हणून त्यांनी पुन्हा एकदा आपली वेगळी ओळख अधोरेखित केली आहे. आष्टी येथील 'राजमाता जिजाऊ विद्यार्थी वसतिगृह'साठी जाहीर केलेली भरीव आर्थिक मदत प्रत्यक्ष सुपूर्द करत त्यांनी सामाजिक बांधिलकी आणि राजकीय प्रामाणिकपणाचा संदेश दिला आहे.

सध्या मतदारसंघात विकासकामे, शिक्षण, बेरोजगारी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून राजकीय वातावरण तापलेले असताना



धोंडे यांनी केलेल्या या मदतीकडे केवळ सामाजिक नव्हे तर राजकीय दृष्टिकोनातूनही पाहिले जात आहे. अनेक वर्षे ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात सातत्याने काम करत असलेल्या धोंडे यांनी पुन्हा एकदा जनतेशी जोडलेले नेतृत्व असल्याचे दाखवून दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदांवर पोहोचावे, या उद्देशाने माजी आ. धोंडे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत अनेक शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि व्यावसायिक शिक्षण केंद्रांना चालना दिली होती. त्याच परंपरेचा भाग म्हणून त्यांनी 'राजमाता जिजाऊ विद्यार्थी वसतिगृह' उभारणीसाठी मदतीची घोषणा केली होती. विशेष म्हणजे, अनेक नेते घोषणा करून विसरतात; मात्र धोंडे यांनी जाहीर केलेली मदत प्रत्यक्ष सुपूर्द करत दिलेला शब्द म्हणजे बांधिलकी हे सिद्ध केले.

वसतिगृहासाठीची मदत स्वीकारताना मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष इंजि. तानाजी जंजिरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण रेडेकर, ड. सीताराम पोकळे, बन्सीधर मोरे, प्रा. डॉ. दत्ता नरसाळे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना पदाधिकाऱ्यांनी धोंडे यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत राजकारणात शब्द पाळणारे नेते दुर्मिळ होत चालले आहेत अशी प्रतिक्रिया दिली.

मतदारसंघात आगामी राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर धोंडे यांच्या या कृतीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. विशेषतः युवक आणि विद्यार्थी वर्गात त्यांच्या या निर्णयाचे स्वागत होत असून, शिक्षणासाठी पुढाकार घेणारे नेतृत्व म्हणून त्यांची प्रतिमा अधिक मजबूत होत असल्याची चर्चा सुरू आहे.

शब्दाला जागणारे नेतृत्व म्हणजे भीमराव धोंडे

मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष इंजि. तानाजी जंजिरे म्हणाले, आजच्या राजकारणात मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; पण त्या पूर्ण करणारे नेते फार कमी आहेत. भीमराव धोंडे यांनी सामाजिक जाणिवेतून व विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी केलेली ही मदत अत्यंत मोलाची आहे. त्यांनी पुन्हा एकदा शब्दाला जागणारे नेतृत्व असल्याचे दाखवून दिले.

# इंधन टंचाईचा कृषी व्यापाराला फटका!

## बाजार समित्यांमध्ये वाहतूक ठप्प; कांदा लिलावात अडचणी

**पुणे । प्रतिनिधी**

**इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून अफवांवर विश्वास ठेवू नका,'' असे प्रशासनाकडून सातत्याने सांगितले जात असले, तरी ग्रामीण भागातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधन टंचाईचे वास्तव कायम आहे. शेतमाल वाहतूक करणाऱ्या वाहनांनाही पेट्रोल-डिझेलसाठी लांब रांगेत थांबावे लागत असल्याने बाजार समित्यांतील कांदा लिलावावर त्याचा थेट परिणाम होत आहे. वेळेत वाहने पोचत नसल्याने आवक घटत असून शेतकरी आणि वाहनधारक आर्थिक अडचणीत सापडले आहेत.**



राज्यातील बहुतांश बाजार समित्यांमध्ये आठवड्यातून तीन ते चार वेळा कांदा लिलाव होतात. उन्हाळ कांद्याची काढणी सुरू झाल्याने सध्या बाजारातील आवक वाढत आहे. अहिल्यानगर बाजार समितीत सोमवारी, गुरुवारी आणि शनिवारी लिलाव होतात. जिल्ह्यासह बीड, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर आदी भागांतून मोठ्या प्रमाणात कांदा विक्रीसाठी येथे आणला जातो. सध्या उष्णतेची तीव्रता अधिक असल्याने नुकसान टाळण्यासाठी शेतकरी तातडीने कांदा बाजारात आणत आहेत. वाहनभाडे कमी पडावे म्हणून अनेक शेतकरी लिलावाच्या आदल्या रात्रीच कांदा भरून वाहने रवाना करतात. मार्गात इंधन भरून रात्रभर प्रवास करत सकाळच्या लिलावाला पोचण्याचे नियोजन असते. मात्र सध्या अनेक वाहनधारकांना मार्गावर इंधन उपलब्ध आहे का, याची चौकशी करतच प्रवास करावा लागत आहे. काही वाहने इंधनासाठी तासन् ?तास पंपांवर उभी राहत असल्याचे चित्र आहे. यामुळे अनेक वाहने लिलाव संपल्यानंतर बाजार समितीत पोचत असून, पुढील लिलावाची वाट पाहावी लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त वाहनभाड्याचा भार पडत आहे. गुरुवारी झालेल्या अहिल्यानगर बाजार समितीच्या लिलावात नेहमीच्या तुलनेत सुमारे २० हजार गोण्या कमी आवक झाल्याचे दिसून आले. अहिल्यानगर येथून देशातील विविध राज्यांत कांद्याची वाहतूक केली जाते. इंधन टंचाईबरोबरच वाढत्या उष्णतेचाही परिणाम वाहतुकीवर होत आहे. एका ट्रकमध्ये सुमारे २५ टन कांदा भरला जातो. दोन दिवसांत पोचणाऱ्या बाजारपेठांमध्ये फारसा फटका बसत नसला, तरी छत्तीसगड, दिल्ली, पंजाब, राजस्थानसारख्या दूरच्या राज्यांत चार ते पाच दिवसांच्या प्रवासादरम्यान कांद्याचे नुकसान वाढत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. ''इंधन टंचाई आणि वाढती उष्णता यामुळे दूरच्या बाजारांसाठी कांदा खरेदी करताना व्यापाऱ्यांनी काहीसा हात आखडता घेतला आहे. त्याचा परिणाम लिलाव आणि दरांवर होत आहे.

## मे महिन्यात कसे असेल हवामान, पावसाची शक्यता?

पुणे : मागील काही दिवसांपासून राज्यात उष्णतेची लाट वाढली आहे. मे महिन्यात तापमानात अजून वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात तापमान सर्वाधिक असून कोकण किनारपट्टीलगत उष्णता वाढल्याचे सांगण्यात येत आहे. मे महिन्यात राज्यातील हवामान कसे असेल याबाबत हवामान विभागाने माहिती दिली असून पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. देशाच्या बहुतेक भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे (दक्षिण द्वीपकल्पीय भारताचे अनेक भाग आणि पूर्व भारतातील काही भाग वगळता) जिथे कमाल तापमान सामान्य ते सामान्यपेक्षा कमी असण्याची शक्यता आहे. मे २०२५ मध्ये, देशातील बहुतेक भागात किमान तापमान सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. मे २०२५ मध्ये, वायव्य आणि मध्य भारत आणि लगतच्या पूर्व भारतातील अनेक भागात उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. राजस्थान, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, गंगीय पश्चिम बंगाल आणि गुजरात, ओडिशा, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि लगतच्या तेलंगणा आणि उत्तर कर्नाटकातील काही भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. मे २०२५ मध्ये संपूर्ण देशात सरासरी पाऊस सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे ( १०९%). देशाच्या अनेक भागात सामान्य ते सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. वायव्य मध्य, पूर्व आणि ईशान्य भारतातील काही भाग वगळता सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. सामान्यत: मे महिन्यात उत्तरेकडील मैदानी प्रदेश, मध्य भारत आणि द्वीपकल्पीय भारतातील लगतच्या भागात सुमारे ३ दिवस उष्णतेची लाट असते. मे २०२५ दरम्यान, वायव्य आणि मध्य भारताच्या अनेक भागांमध्ये आणि लगतच्या पूर्व भारतातील सामान्यपेक्षा जास्त उष्णतेच्या लाटेचे दिवस असण्याची शक्यता आहे. राजस्थान, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, गंगेचा पश्चिम बंगाल आणि गुजरात, ओडिशा, छत्तीसगड, महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये आणि लगतच्या तेलंगणा आणि उत्तर कर्नाटकच्या अनेक भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.उष्णतेच्या लाटेदरम्यान, वाढलेले तापमानामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः वृद्ध, मुले आणि पूर्वीपासून आरोग्य समस्या असलेल्या लोकांसाठी, ज्यांना उष्णतेमुळे होणारे आजार जसे की उष्माघात आणि उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. याव्यतिरिक्त, दीर्घकाळापर्यंत अति उष्णतेमुळे डिहायड्रेशन होऊ शकते आणि पॉवर ग्रिड आणि वाहतूक व्यवस्था यासारख्या पायाभूत सुविधांवर ताण येऊ शकतो.

## मातीपरिक्षण करण्यासाठी नेमकी वेळ कोणती




अनेक शेतकरी माती परिक्षण करतात. पण काही शेतकरी माती परिक्षण वेळवर करत नाहीत तर काही शेतकऱ्यांना आपण मातीपरिक्षण नेमक कोणत्या उद्देशानं करतोय हेच माहीत नसत. त्यामुळे माती परिक्षणाचा म्हणावा तसा फायदा होत नाही.

माती परीक्षण करण्यामागचा उद्देश : माती परीक्षण आपण नेमक्या कोणत्या उद्देशाने करणार आहोत, हे माहिती असले पाहिजे. कारण उद्देशानूसार माती परिक्षणाचा नमुना घेण्याची पद्धत ही वेगवगळी असते. त्यानुसार शेतातून मातीचा नमुना घेण्याची पद्धत ठरवावी लागते. शेतामधील माती साधारणतः तीन उद्देशांसाठी तपासली जाते. यामध्ये पहिला उद्देश म्हणजे विविध हंगामी पिके म्हणजे तुम्ही जर अन्नधान्य पिके, भाजीपाला किंवा फुल पिके जर घेणार असाल तर या पिकाच्या खत नियोजनाच्या दृष्टीने माती परिक्षण कराव लागते. तुम्ही जर बहूवर्षीक म्हणजे लिंबू, आंबा, डाळिंब, पेरू, सीताफळ आणि चिकू यासारखी फळपिके घेणार असाल तर या फळपिकांच्या खत नियोजनासाठी माती परिक्षण करावं लागत. हा झाला दुसरा उद्देश. आणि मातीपरिक्षणाचा तिसरा उद्देश म्हणजे तुम्ही जर नविन फळबागेची लागवड करणार असाल तर त्यासाठी आपली जमीन योग्य आहे किंवा नाही हे तपासण्याची गरज असते. या उद्देशानूसार मातीपरिक्षणाचा नमुना घेऊन मातीपरिक्षण केले तर त्याचा नक्कीच फायदा होतो.

मातीचा नमुना घेण्याची वेळ : मातीचा नमुना शक्यतो खरीप किंवा रब्बी पिकाच्या काढणीनंतर जमीन नांगरणी करण्याआधी आणि कोरडी असताना घ्यावा. कारण माती परीक्षण अहवाल पुढील हंगामातील पेरणीपूर्वी उपलब्ध होणे गरजेचे आहे. म्हणजे त्यानुसार खतांचा नियोजन करणे सोपे जाते. प्रयोगशाळेत नमुना दिल्यानंतर साधारणपणे अहवाल मिळण्यासाठी एक महिन्याचा वेळ लागू शकतो.ते गृहीत धरून मातीचा नमुना प्रयोगशाळेत परीक्षणासाठी पाठवावा. माती परिक्षणाच्या प्रयोगशाळा जवळचे कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र याठिकाणी असतात. या ठिकाणी माफक शुल्कामध्ये माती परिक्षण करून अहवाल मिळतो. काही शहरामध्ये खासगी प्रयोगशाळेतही मातीपरीक्षण करुन मिळते. माती परिक्षणाचा अहवाल मिळाल्यानंतर तो त्या ठिकाणच्या शास्त्रज्ञांकडून समजून घ्यावा. विशेष करुन आपण कोणती पिके घेणार आहोत त्यानूसार खत नियोजनाची माहिती घेण्याचा प्रयत्न करावा. माती परीक्षण अहवालाची वैधता ही साधारणपने दोन ते तीन वर्षांपर्यंत असते. त्यानंतर पुन्हा माती परिक्षण कराव.

यामध्ये पाण्याची सोय असलेल्या शेतात वर्षातून दोन किंवा जास्त हंगामात पिके घेत असाल तर अशा शेताचे माती परीक्षण दर दोन वर्षांनी कराव. आणि जर तुम्ही वर्षातून फक्त एकाच हंगामात पीक घेत असाल तर अशा शेताचे दर तीन वर्षांनी माती परीक्षण करावे. अशा प्रकारे योग्य वेळी मातीपरिक्षण करुन मातीपरिक्षणाचा अहवाल समजून घेऊन खत नियोजन केल तर मातीपरिक्षणाचा नक्कीच फायदा होतो.

## ठिबकद्वारे खते द्या थेट मुळांशी



ठिबक सिंचन पद्धतीत पाण्याद्वारे पाण्यात विरघळणारी (विद्राव्य) खते पिकाच्या मुळांशी योग्य त्या प्रमाणात व पाहिजे त्या वेळी (पिकांच्या गरजेनुसार) परिणामकारकरित्या देता येतात. पाण्याबरोबर खते व मूलद्रव्ये देण्याच्या या प्रकारास शास्त्रीय भाषेत फर्टिगेशन असे म्हणतात.

ठिबक सिंचनाद्वारे खते देताना प्रमाणबद्ध आणि मात्राबद्ध पद्धतीने देता येतात. प्रमाणबद्ध पद्धतीमध्ये खताची तीव्रता खत देण्याच्या संपूर्ण कालावधीमध्ये स्थिर राहते. खतमात्रा व पाण्याचा प्रवाह सतत एकसारखा राहतो. उदा. एक लिटर खत द्रावण आणि १०० लिटर पाणी या पद्धतीमध्ये खतमात्रा तीव्रतेच्या स्वरूपात म्हणजेच ''पीपीएम'मध्ये मोजली जाते. मात्राबद्ध पद्धतीमध्ये खताची तीव्रता बदलत राहते. ठिबक सिंचनाद्वारे खत मिश्रित व खत विरहित पाणी पिकाच्या मुळांशी सतत दिले जाते. या पद्धतीमध्ये खतमात्रा कि. ग्रॅम/हेक्टर या स्वरूपात मोजली जाते.

फर्टिगेशनचे फायदे :खतांचा अधिक कार्यक्षमतेने वापर. द्रवरूप खत पिकांच्या मुळांद्वारे लवकर शोषली जातात. त्यामुळे खतांचा अपव्यय टळतो. त्यामुळे खतमात्रेत २५ ते ५० टकके बचत होते. तर पाण्यामध्ये ३० ते ५० टक्के बचत होते. खतांच्या उपलब्धतेत वाढ. पिकांच्या मुळांच्या जवळच खत आणि पाणी दिलं जातं. त्यामुळे खत आणि पाणी यांची वापरक्षमता वाढते.

मजुरीच्या खर्चात बचत :पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि गरजेनुसार आवश्यक त्या प्रमाणात खत देता येतात. दर्जेदार व अधिक उत्पन्न मिळते. पीक लवकर तयार होते. उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते.

जमीनीच आरोग्य अबाधित राखलं जाते :द्रवरूप खतातून पिकाला लागणारी सर्वच्या सर्व अन्नद्रव्य एकाच वेळी दिली जातात. हलक्या प्रतीच्या जमिनीत देखील पिकं घेता येतात. आम्लयुक्त विद्राव्य खतामुळे ठिबक संचामध्ये आपोआप रासायनिक स्वच्छता होते. पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि गरजेनुसार आवश्यक त्या प्रमाणात खत देता येतात. खतांची कार्यक्षमता ८० ते ९० टक्क्यांपर्यंत वाढविता येते. विद्राव्य खतांमध्ये सोडियम आणि क्लोरिनचे प्रमाण अतिशय कमी असते. सूक्ष्म द्रवरूप खतांची फवारणी पिकांवर त्वरित करता येते.

फर्टिगेशनसाठी खते निवडतांना घ्यावयाची काळजी :खते पाण्यामध्ये लवकरात लवकर विरघळणारी असावीत. खतांची विरघळण्याची क्षमता अधिक असावी. पाण्यात विरघळल्यानंतर त्यातील क्षारांचे अविद्राव्य स्वरुपात एकत्रीकरण होता कामा नये. खताच्या संचाच्या घटकांवर कोणताही परिणाम होणार नाही अशी खते निवडावीत. खते शेतातील वापरासाठी सुरक्षित असावीत. खतांची पाण्यात असणाऱ्या क्षारांबरोबर कोणत्याही प्रकारची रासायनिक अभिक्रिया होणार नाही याची काळजी घ्यावी. एकाच वेळी एकापेक्षा अधिक खते एकत्र द्यावयाची असल्यास त्यांची आपापसात कोणतीही रासायनिक अभिक्रिया होणार नाही अशीच खते एकत्रित द्यावीत. ठिबक संचातून युरिया, डायअमोनियम फॉस्फेट व म्युरेट ऑफ पोटॅश हि खते देता येतात

फर्टिगेशनसाठी उपकरणे :सूक्ष्म सिंचन संचातून पिकांना विद्राव्य खते देण्यासाठी प्रामुख्याने खताची टाकी / फर्टिलायझर टँक , व्हेन्चुरी इंजेक्शन पंप इत्यादी उपकरणे वापरली जातात. वर नमूद सर्व उपकरणांमध्ये सर्वाधिक वापरले जाणारे व फायदेशीर असे उपकरण आहे व्हेन्चुरी.

व्हेन्चुरी तंत्रज्ञान :व्हेन्चुरी ही डमरूच्या आकाराची मध्यभागी कमी होत जाणारी व्यासाची असल्यामुळे पाण्याचा वाहण्याचा वेग वाढतो व व्हेन्चुरीच्या मध्यभागी उपलब्ध दाब कमी होऊन हवेची पोकळी निर्माण होते (व्हॅकयूम). ह्यामुळे खताच्या टाकीमधील खताच्या द्रावणाचे शोषण होऊन पुढे मुख्य नळीमधून संचामध्ये आलेले खत उपनळ्यांमधून सिंचनाच्या वेळी ड्रीपर्समार्फत पिकांच्या मुळांजवळ दिले जाते. खत टाकीमधील पाण्यात मिसळावे व नंतर त्या टाकीत व्हेन्चुरी नलिकेतून निघालेली नळी सोडण्यात यावी.ठिबक सिंचन संच सुरु केल्यानंतर दोन्ही नियंत्रण झडपा सुरु केल्या कि मग टाकीतील खते व्हेन्चुरीतून शोषले/ ओढले जातात व ते संचाच्या पाईपमधील पाण्याच्या प्रवाहात मिसळून उपनलीकेवरील असलेल्या ड्रीपरमधून झाडांच्या / पिकांच्या मुळांच्या कक्षेत सोडले जातात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८९६ : निकोलस (दुसरा) रशियाचा झार बनला.
१९५० : ब्रिटन देशाने पेट्रोलच्या खरेदीसाठी राशन कार्डच्या सक्तीचा कायदा रद्द केला.
१९८६ : युरोपमधील देशांनी युरोपीय संघाचा झेंडा स्वीकारला.
१९७१ : बांगलादेशातील सिल्हेट येथे पाकिस्तानी सैन्याने ७१ हिंदूंची कत्तल केली.
१९७३ : बहारीन देशाने संविधान स्वीकारले.
१९८९ : मुंबईजवळच्या न्हावा-शेवा बंदराचे उद्घाटन झाले.
१९९१ : लॉडा एर फ्लाइट ००४ हे बोईंग ७६७ प्रकारचे विमान हवेत असताना थ्रस्ट रिव्हर्सर लागल्याने थायलंडमध्ये पडले. २२३ ठार.
१९९९ : भारत-पाकिस्तानमध्ये कारगिल युद्धाची सुरुवात.
१९९९ : श्रीहरिकोटा येथून पी. एस. एल. व्ही. सी. २ या धृवीय उपग्रहवाहकाने भारताचा आय. एस. एस. पी. ४ (ओशनसॅट), कोरियाचा किटसॅट व जर्मनीचा डी. एल. आर. टबसॅट या तीन उपग्रहांना त्यांच्या कक्षेत यशस्वीरीत्या पोहोचवले.
२००७ : भारत आणि जर्मनी देशांतर्गत सुरक्षा संबंधी करार करण्यात आले.
२०१४ : नरेंद्र मोदी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७८ : पोप क्लेमेंट सातवा.
१५६६ : महमद तिसरा, ओट्टोमन सम्राट.
१६६७ : फ्रेन्च गणिती अब्राहम डी. मुआव्हर यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर १७५४)
१७९९ : अलेक्सांद्र पुश्किन, रशियन लेखक.
१८६७ : टेकची मेरी, पंचम जॉर्जची राणी.
१८८५ : नाटककार, कवी व विनोदी लेखक राम गणेश गडकरी यांचा जन्म. (मृत्यू: २३ जानेवारी १९१९)
१९०२ : नाटककार व साहित्यिक सदाशिव अनंत शुक्ल ऊर्फ कुमुदबांधव यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १९६८)
१९०६ : बेंजामिन पिअरी पाल, भारतीय कृषी वैज्ञानिक व संशोधक.
१९०७ : जॉन वेन, अमेरिकन अभिनेता.
१९०८ : न्विन न्गॉक थो, दक्षिण व्हियेतनामचा पंतप्रधान.
१९०९ : आदोल्फो लोपेझ मटियोस, मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्ष.
१९१२ : यानोस कादार, हंगेरीचा पंतप्रधान.
१९३० : भारतीय-ईराणी भाषेतील शब्दलेखक आणि समीक्षक करीम इमामी यांचा जन्म. (मृत्यू: ९ जुलै २००५)
१९३७ : भारतीय अभिनेत्री आणि गायक मनोरमा यांचा जन्म. (मृत्यू: १० ऑक्टोबर २०१५)
१९३८ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता बी. बिक्रम सिंग यांचा जन्म. (मृत्यू: १२ मे २०१३)
१९४५ : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री विलासराव देशमुख यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑगस्ट २०१२)
१९४६ : प्रख्यात भारतीय राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्या तसचं, मजदूर किसान शक्ती संघटनेच्या संस्थापिका अरुणा रॉय यांचा जन्मदिन.
१९४९ : हँक विल्यम्स जुनियर, अमेरिकन संगीतकार.
१९६१ : भारतीय-अमेरिकन दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक तारसेम सिंग यांचा जन्म.
१९६६ : झोला बड, दक्षिण आफ्रिकेची धावपटू.
१९६८ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन अभिनेते, तसचं, दूरदर्शन विनोदी मालिका तारक मेहता का उलटा चश्मा या विनोदी मालिकेतील प्रख्यात कलाकार दिलीप जोशी यांचा जन्मदिन.
१९८३ : अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेल रत्न, पद्मश्री, सीएनएन-आयबीएन इंडियन ऑफ दी इयर स्पोर्ट्स तसचं, सन २००८ साली झालेल्या उन्हाळी ऑलिंपिकमधील कुस्ती पुरुष फ्रीस्टाईल लाइटवेट पदक विजेता सुप्रसिद्ध भारतीय फ्री स्टाईल कुस्तीपटू सुशील कुमार सोलंकी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७०३ : विख्यात इंग्रजी रोजनिशीकार व कुशल प्रशासक सॅम्युअल पेपिस यांचे निधन. (जन्म: २३ फेब्रुवारी १६३३)
१९०२ : अमेरिकन संशोधक अल्मोन स्ट्राउजर यांचे निधन. (जन्म: ११ फेब्रुवारी १८३९)
१९०८ : अहमदिया पंथाचे संस्थापक मिर्झा गुलाम अहमद यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी १८३५)
१९७२ : सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेत्री राजलक्ष्मी यांचे निधन.
२००० : प्रभाकर शिरुर, चित्रकार.
२००० : अर्थतज्ञ व लेखक, मराठी भाषेतील पहिल्या अर्थविषयक नियतकालिकाचे संपादक श्रीपाद वामन काळे यांचे निधन.
२०१४ : भारतीय राज्य केरळमधील पठाणमथिट्टा जिल्ह्यातील मालंकारा ऑर्थोडॉक्स सिरियन चर्च चे धर्मगुरू कॅथोलिक बेसीलिओस मार थोमा डिडिमॉस पहिले यांचे निधन.
२०१७ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय पोलीस सेवा अधिकारी आणि पंजाब राज्याचे माजी पोलीस महासंचालक कंवर पाल सिंह गिल यांचे निधन.

सोमवार दि.२५ मे २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# गुटखा माफियावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना। प्रतिनिधी

बदनापुर येथे मानवी आरोग्यास घातक गुटखा व पानमसाला विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई करण्यात आली थोडक्यात हकीकत अशी की दिनांक २४/०५/२०२६ रोजी मा. श्री. तेघबीर सिंह संधु पोलीस अधीक्षक तसेच मा. अप्पर पोलीस अधिक्षक विक्रम साळी यांचे मानवी आरोग्यास घातक प्रतिबंधीत गुटखा वाहतुक व विक्री करणारे संबंधी माहिती घेऊन कारवाई करणे बाबत असलेल्या ठिकाणाची गुप्तहेरांकडून माहिती मिळाली असता यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास आदेशित केल्याने पोलीस सदर ठिकाणी जाऊन बातमीतील आरोपी नामे जावेद गुलाब मिर्झा बेग, रा. शेकटा, ता.जि. छत्रपती संभाजीनगर हा त्यांच्या वाहनामध्ये गुटखा व पानमसाला घेवुन बाजार गेवराई मार्गे बदनापुर कडे अशोक लेलैंड वाहन क्र. २०२१९४ ने येत असल्याची माहिती मिळाली.



सदर गुटखा व पानमसाला ताब्यात घेवुन त्यास पोलीस ठाणे बदनापुर येथे घेवुन आलो. सुमारे ०१.३६ वा. सु. छापा कारवाई केली गुटखा व पानमसाला जप्त करून बदनापुर पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास पोउपनि श्री कुकलारे हे करत आहे. सदर गुन्ह्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे. गुरंन- २७८/२०२६ कलम १२३, २२३, २७५, ३ (५) भारतीय न्याय संहिता कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मुद्देमाल- १६८७५०/- रु. किंमतीच्या पांढऱ्या रंगाच्या भोदमधील गोण्यांमध्ये राजनिवास पान मसालाचे १५३०००/- रु. किंमतीच्या पांढऱ्या रंगाच्या भोदमधील गोण्यांमध्ये गोवा-१०००. ६०००/- रु. किंमतीच्या पांढऱ्या रंगाच्या गोण्यांमध्ये वि-१ विंग तंबाखु. ०४) १३०६८०/-रु. किंमतीच्या खाकी रंगाच्या भोदमधील गोण्यांमध्ये विमल पान मसाला.१०८०००/-रु. किंमतीच्या पांढऱ्या रंगाच्या भोदमधील गोण्यांमध्ये के एन ०१ जाफरानी जर्दा. ७०००००/- रु. किंमतीचे आयरीश असे वाहन जुने वापरते किंमत अंदाजे १२,६६,४३०/- एकुण किंमत. आरोपी - जावेद गुलाब मिर्झा बेग वय ३४ वर्षे, रा. शेकटा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर, रा. राजुर जि. जालना.छापा कारवाई सदरची कारवाई मा. तेगबिर सिंह संधु पोलीस अधीक्षक,मा. विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक सो, उपविभाग जालना श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पोउपनि राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार सागर बाविस्कर, देविदास भोजने, दत्ता वाघुंडे, आक्रूर धांडगे, धिरज भोसले, सोपान क्षीरसागर, सचिन राऊत, अशोक जाधवर सर्व स्था.गु.शा.

## पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयातील अधीक्षक डॉ.सचि न दरंदले यांची आरोग्यमंत्र्यांकडे तक्रार




पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयातील अधीक्षक डॉ.सचिन दरंदले यांची तात्काळ बदली करावी तसेच अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांची ही बदली करावी अशी मागणी पाथर्डीतील नागरिकांनी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे याबाबत अण्णा उर्फ किशोर हरेर व शहनावाज शेख यांनी मंत्रालयात सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की सचिन दरंदले यांनी ९ ऑगस्ट २०२२ रोजी पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला मात्र गेल्या चार वर्षापासून त्यांनी एकदाही उपजिल्हा रुग्णालयात ओपीडीची सेवा रुग्णांना दिली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच महाराष्ट्र बदली कायदा २००५ कलम ३ व ४ अनुसार शासकीय अधिकाऱ्यांच्या बदलीचा कार्यकाळ तीन वर्षाचा असतो मात्र सचिन दरंदले हे पाच वर्ष पेक्षा अधिक काळापासून पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असून बदली नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयातील काही आरोग्य कर्मचारी दहा ते पंधरा वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असून रुग्णांना अपमानास्पद वागणूक देत असून रात्री ग्रामीण भागातून आलेल्या रुग्णांना आरोग्य सेवा देत नसून अरेराविची भाषा वापरत आहेत पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात एकाच ठिकाणी दीर्घकाळ राहिल्याने कर्मचारी व प्रशासनामध्ये हितसंबंध निर्माण झाले असून कर्मचाऱ्यावर कोणत्याही प्रशासकीय विभागाचे नियंत्रण राहिलेले नाही असा आरोप करण्यात आला आहे सचिन दरंदले यांच्या कार्यकाळातील विविध तक्रारीची चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना कोणत्याही अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात येऊ नये तसेच १०८ रुग्णवाहिका उपजिल्हा रुग्णालयात इंधनाअभावी उभे असून शोभेच्या वास्तू बनले आहेत.

डायलिसिस तज्ञ डॉक्टरांचा अभाव सोनोग्राफी एक्स-रे तपासणीत अनियमितता यामुळे पाथर्डी उपजिल्हा रुग्णालय रुग्णसेवेची इमारत नसून खुंटक खाना आहे की काय असा प्रश्न रुग्णांना पडला असून पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात तातडीने नवीन अधीक्षक नियुक्त करून मनमानी कारभार करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांची हकालपट्टी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# 'कॉकरोच जनता पार्टी'ला अण्णा हजारेंचा पाठिंबा

### नाव अजब असले, तरी तरुणाई पाठीशी; सरकारला दिला मोठा सल्ला

अहिल्यानगर। प्रतिनिधी

सोशल मीडियावर अल्पावधीत तुफान लोकप्रिय झालेली आणि प्रस्थापित राजकीय पक्षांना आव्हान देऊ पाहणारी 'कॉकरोच जनता पार्टी' () सध्या वादाच्या आणि चर्चेच्या भोवऱ्यात आहे. या पक्षावर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स आणि संकेतस्थळांमार्फत बंदी घालण्याचे प्रयत्न झाले असतानाच, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या चळवळीला पाठबळ दिले आहे. ''नाव जरी अजब असले, तरी या पक्षाच्या मागे देशातील तरुण उभा राहिला आहे, हे महत्त्वाचे आहे,'' अशा शब्दांत अण्णा हजारे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. 'कॉकरोच जनता पार्टी' ही एक उपहासात्मक ऑनलाइन मोहीम आहे. १५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांचे खंडपीठ वरिष्ठ वकील दर्जा मिळवण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करत होते. यावेळी सूर्यकांत म्हणाले, ''झुरळांसारखे असे तरुण आहेत, ज्यांना या व्यवसायात रोजगार मिळत नाहीये. यापैकी काही मीडिया, काही सोशल मीडिया आणि काही व इतर प्रकारचे कार्यकर्ते बनत आहेत. हे प्रत्येकजणावर हल्ला करायला सुरुवात करतात.''




त्यानंतर 'कॉकरोच जनता पार्टी' ही मोहीम सुरू झाली.

लोकपाल आंदोलनाचे जनक अण्णा हजारे यांनी कॉकरोच जनता पार्टीबाबत भाष्य करताना सरकारला मोलाचा सल्ला दिला. ते म्हणाले, ''झुरळ हे नाव कदाचित योग्य वाटणार नाही, पण या पार्टीचा उद्देश समजून घेणे गरजेचे आहे. नाव काहीही असले तरी देशातील तरुण या पार्टीच्या पाठीशी उभा आहे. युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती असते. जेव्हा या दोन्ही शक्तींचा संगम होतो, तेव्हा सरकारने त्यांचा अव्हेर न करता त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.'' दरम्यान, गेल्या काही दिवसांत कॉकरोच जनता पार्टीचे 'एक्स', 'इन्स्टाग्राम' अकाऊंट आणि त्यानंतर १० लाख नोंदणी झालेले अधिकृत संकेतस्थळ बंद करण्यात आले होते. यंत्रणांनी दिलेल्या या झटक्यानंतरही सीजेपीने हार मानलेली नाही. संस्थापक अभिजीत दीपके यांनी 'एक्स'वर पोस्ट करत माहिती दिली की, त्यांनी त्यांचे इन्स्टाग्राम खाते पुन्हा मिळवले असून पक्ष नव्या दमाने कामाला लागला आहे. दरम्यान, या आभासी पक्षामुळे चर्चेत आलेले अभिजीत दीपके यांना अज्ञात व्यक्तींकडून धमक्या आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर पोलिस प्रशासन सतर्क झाले असून, सिडको वाळूज महानगर-१ येथील त्यांच्या पालकांच्या घरासमोर कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सुरक्षिततेसाठी दोन अधिकारी आणि २२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवले जात आहे.

# पिकांचे नुकसान:लासूर, पाचोड, शिऊरला अवकाळीचा तडाखा

### देवळीमध्ये वीज पडून बैल ठार, शिऊर येथे शेडनेट कोसळले, वीजपुरवठा खंडित

ढोरकीन। प्रतिनिधी

लासूर स्टेशन, सावंगी, देवळीसह परिसरात शनिवारी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास विजेच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. रोहिणी नक्षत्र लागण्यापूर्वीच आलेला पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या कांदा, तसेच फळबागांचे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे शेतशिवारातील अनेक झाडे उन्मळून पडल्याने विजेच्या तारा तुटल्या. परिणामी, संपूर्ण परिसराचा वीज पुरवठा खंडित होता. रात्री उशिरापर्यंत महावितरणचे कर्मचारी युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम करत होते, अशी माहिती अभियंता भुते यांनी दिली. देवळी, सुलतानाबाद, महंमदपूर, आरापूर आणि गवळी शिवारातही पावसाचा तडाखा




बसला.

ढोरकीन । पैठण तालुक्यातील रांजणगाव खुरी येथे उरुसानिमित्त सुरू असलेल्या यात्रेला शनिवारी वादळी वाऱ्याचा फटका बसला. अचानक आलेल्या वादळामुळे यात्रा परिसरातील अनेक स्टॉल, तंबू, खेळणी दुकाने तसेच रहाट पाळणे कोसळल्याने मोठे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. काही ठिकाणी लोखंडी पत्र्यांचे तंबू कोसळले आहेत. जुने देवळी परिसरातील सुलतानाबाद शिवारात वीज पडून शेतकरी परसराम कचरू पाटील तायडे यांचा खिल्लार जातीचा बैल ठार झाला. दुसरीकडे, महंमदपूर शिवारातील शेतकरी नंदू भागीनाथ पाटील जाधव यांचे एक एकर क्षेत्रावरील शेडनेट वादळाने भुईसपाट झाले. शेडनेटमधील कोथिंबीर पिकासह १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. वैजापूर तालुक्यातील शिऊर येथे शेतकरी अर्जुन कारभारी क्षीरसागर यांच्या गट क्र. १०८५ मधील एक एकर क्षेत्रावरील शेडनेट उडून गेले. शेतकरी निलेश सुराशे यांच्या गोठ्यावरील पत्रे उडून गेली आहेत. पाचोड जवळील मुरमा, कोळी बोडखा, सानपवाडी परिसरात ५ वाजेच्या सुमारास गारांसह जोरदार पाऊस झाला. यामुळे काढणीस आलेली उन्हाळी बाजरीची पिके जमिनीवर आडवी झाली.

## मालेवाडी ग्रामपंचायत सर्वे नावाखाली तब्बल एक लाख वीस हजारांची लूट ?

पाथर्डी । प्रतिनिधी

मालेवाडी ग्रामपंचायत अंतर्गत जवळपास ४००० लोकसंख्या असलेल्या गावातील जवळपास ८०० कुटुंबाचा फेर सर्वे काही खाजगी एजन्सी मार्फत करण्यात आला यामध्ये मालेवाडी ग्रामपंचायतचे प्रशासक व ग्रामविकास अधिकारी मल्हारी दहिफळे यांनी ग्रामपंचायत ग्रामनिधी कर माध्यमातून तो खर्च देणे अपेक्षित असताना मालेवाडी गावातील गोरगरीब ग्रामस्थांच्या खिशाला कात्री लावत १४० रुपये पावती याप्रमाणे ८०० कुटुंबाची जवळपास एक लाख वीस हजार रुपये उकळून खाजगी सर्वे कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना दिले आहेत यामुळे मालेवाडी ग्रामस्थांची फसवणूक करून ग्रामनिधीच्या गावच्या पैशांचा गैरवापर करण्याचा फतवा ग्रामविकास अधिकारी मल्हारी दहिफळे यांनी केला आहे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम १२४ अनुसार ग्रामपंचायत अंतर्गत मालेवाडी गावातील ग्रामस्थांची फसवणूक केल्याप्रकरणी ग्रामसेवक मल्हारी दहिफळे यांच्यावर शिस्तभंग व निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे या संदर्भात पाथर्डी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी लेखी तक्रार प्राप्त झाल्यास जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे चौकशी समितीचा सविस्तर अहवाल देऊन ग्रामसेवक मल्हारी दहिफळे यांच्यावर शिस्तभंग व निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याची ग्वाही दिली आहे.

## जवळा परिसरात फळबागा भुईसपाट, सरसकट पंचनामे करण्याची मागणी

जवळा । प्रतिनिधी

जवळा आणि परिसर परिसरामध्ये शुक्रवारी (२२ मे) दुपारी अचानक आलेल्या मुसळधार पाऊस आणि तीव्र वादळी वाऱ्याने हाहाकार उडवला. या नैसर्गिक आपत्तीत परिसरातील केळी, पपई, डाळिंब आणि आंब्याच्या शेकडो हेक्टरवरील बागा जमीनदोस्त झाल्या असून शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. या अस्मानी संकटामुळे हवालदील झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने तातडीने सरसकट पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी तीव्र मागणी आता जनतेतून होत आहे.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून परिसरात ढगाळ वातावरण होते. मात्र, पाऊस किरकोळ स्वरूपाचा असेल असा अंदाज वर्तवला जात असतानाच, शुक्रवारी दुपारी अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. जवळा परिसर हा कुकडी डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रात येत असल्याने हा भाग बागायतदार आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध मानला जातो. येथील शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने केळी, डाळिंब आणि पपईच्या बागा फुलवल्या होत्या. मात्र, या वादळाने होत्याचे नव्हते केले. अनेक ठिकाणी सोलर पंपांचे महागडे साहित्य हवेत उडून गेल्याने शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान झाले आहे.

# जिव्हाळा फाउंडेशन'च्या वतीने जामखेड येथे सामाजिक विषयांवर विशेष चर्चासत्राचे आयोजन

### सद्य सामाजिक आव्हाने, युवा पिढी समोरील प्रश्न आणि शिक्षण व्यवस्थेवर विचारवंतांचे मंथन

जामखेड । प्रतिनिधी

येथील जिव्हाळा फाउंडेशनच्या वतीने 'जागर लोकशाहीचा' या अभियानांतर्गत सामाजिक, शैक्षणिक आणि कौटुंबिक विषयांवर एका विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात समाजातील वाढती गुन्हेगारी, तरुण पिढीसमोरील आव्हाने, ग्रामीण भागातील समस्या आणि शैक्षणिक बदल यावर विविध क्षेत्रांतील अभ्यासक आणि विचारवंतांनी आपली मते मांडली.

चर्चासत्रात प्रामुख्याने तरुण पिढीमध्ये निर्माण होत असलेल्या सामाजिक समस्यांवर चिंता व्यक्त करण्यात आली. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे पालक आणि मुलांमधील संवाद कमी होत चालला आहे. अल्पवयीन व तरुण मुली घरातून निघून जाण्याच्या वाढत्या घटना आणि त्याचे कौटुंबिक स्तरावर होणारे गंभीर परिणाम यावर श्री. कदम

> ''केवळ प्रशासनावर विसंबून न राहता प्रत्येक नागरिकाने आपल्या वेळेतील काही भाग सामाजिक कार्यासाठी व जनजागृतीसाठी दिला पाहिजे, तरच गाव आणि समाजपातळीवर सकारात्मक बदल घडून येईल.''
>
> – श्री गुलाब जांभळे, आयोजक, जिव्हाळा फाउंडेशन

सर यांनी सविस्तर प्रकाश टाकला. अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर त्रुटींचा गैरवापर थांबवण्यासाठी आणि अनधिकृत विवाहावर नियंत्रण आणण्यासाठी कायदेशीर तरतुदी अधिक कडक करण्याची गरज वक्त्यांनी व्यक्त केली. शाळा-महाविद्यालयांमधून संस्कार आणि नैतिक शिक्षणावर अधिक भर देण्याचे आवाहन श्री भोरे मेजर यांनी केले.

ग्रामीण भागातील सद्य परिस्थितीवर बोलताना प्रा. मधुकर राळेभात यांनी तरुणांच्या रोजगाराचा आणि शेतकरी कुटुंबातील मुलांच्या विवाहाचा प्रश्न उपस्थित केला. सद्यस्थितीत उच्चशिक्षित तरुणांनाही नोकरी मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना विवाह जमवताना येणारे अडथळे यावर चर्चा झाली. समाजातील विवाहविषयक मानसिकतेत लवचिकता आणण्याची गरज असून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे हे सामाजिक कर्तव्य असल्याचे प्रतिपादन वक्त्यांनी केले.

बदलत्या शैक्षणिक धोरणावर बोलताना, ग्रामीण भागातील शासकीय आणि अनुदानित शाळा-महाविद्यालयांच्या सद्यस्थितीवर चिंता व्यक्त करण्यात आली. शिक्षण सर्वसामान्यांच्या आवाक्यात राहण्यासाठी सामाजिक स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. तसेच, कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी नागरिकांची सजगता आणि प्रशासकीय पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत मांडण्यात आले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही मूल्ये तसेच संत तुकाराम महाराज आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून समाजाने एकत्र येणे गरजेचे असल्याचा सूर उमटला. या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे जामखेड शहरातील निवृत्त शिक्षकांनीच ही संकल्पना काढून आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून समाज प्रबोधनाचा शिवधनुष्य हाती घेण्याचे ठरले आह.

या चर्चासत्रात मधुकर आबा राळेभात, गुलाब जांभळे, ढाळे सर, कदम सर, वीर सर, रवींद्र कडलग यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास परिसरातील सुजाण नागरिक, विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुगार, दारू व वाळूचोरी प्रकरणी मंठा पोलिसांची कारवाई



मंठा। प्रतिनिधी

मंठा पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत विविध प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल केले आहेत. अवैध जुगार, दारू विक्री तसेच वाळूचोरी करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलण्यात आली असून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीसांनी केलेल्या कारवाईत अवैध जुगाराच्या २ केसेसमध्ये तब्बल १ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अवैध दारू विक्रीच्या २ प्रकरणांमध्ये १ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

याशिवाय वाळूचोरीच्या १ प्रकरणात सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करत संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंठा परिसरात अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याची माहिती पोलिस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी दिली. या धडक कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

सोमवार दि.२५ मे २०२६ | ६

# बैलगाडी शर्यत म्हणजे शेतकरी संस्कृतीचा उत्सव -राजेंद्र मस्के

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे दिमाखदार 'धर्मवीर केशरी' बैलगाडी शर्यत संपन्न!

बीड । प्रतिनिधी

बैलगाडी शर्यत ही गावकुसातील सामाजिक ऐक्य, जिद्द आणि कृषी परंपरेचे दर्शन घडवणारी लोकपरंपरा असून, ग्रामीण संस्कृतीचे जिवंत प्रतीक आहे. शेतकऱ्याने कष्टाने आणि प्रेमाने वाढवलेले बैल मैदानात धावताना केवळ वेगाचे प्रदर्शन करत नाहीत, तर कष्ट, निष्ठा आणि मातीतल्या नात्याचे अविस्मरणीय दर्शन घडवतात. ग्रामीण जीवनातील उत्साह आणि शेतकरी संस्कृतीचा खरा उत्सव म्हणजे बैलगाडी शर्यत होय, असे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे भव्य बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. अनावश्यक खर्चाला फाटा देत, येथील



प्रथम विजेत्यास राजेंद्र मस्के यांच्याकडून ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस

तरुणांनी पशुपालक आणि शेतकरी बांधवांना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करून महापुरुषांच्या जयंतीला विधायक दिशा देण्याचे कौतुकास्पद कार्य केले, असेही मस्के यांनी नमूद केले.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब



जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धा पाहण्यासाठी परिसरातील बैलगाडी शर्यत रसिकांनी मोठी गर्दी केली होती. ढोल-ताशांच्या गजरात आणि प्रेक्षकांच्या जल्लोषात

बैलगाडी शर्यतीतील प्रथम विजेत्या स्पर्धकासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या वतीने ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस आयोजकांकडे सुपूर्द करण्यात आले.

संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमून गेला होता. ग्रामीण वातावरणात या स्पर्धेमुळे वेगळीच ऊर्जा आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी अमर आबदार,अँड गणेश वाणी, अशोक वाणी, विक्की वाणी,बालकृष्ण थोरात,राजाभाऊ गिरे,दत्तात्रेय मोरे , दादासाहेब गायकवाड,अक्षय आबदार, महेश ढवळे,बाळासाहेब मोरे,शेख समीर, निर्मळ, चव्हाण,उध्दव जाधव ,सुरज ढवळे, कैलास काटे, रोहित भोसले, दिनेश ढवळे सह आदी उपस्थित होते.

# बळीराम निर्मळ हत्या प्रकरणातील आरोपीला जन्मठेप

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथे २६ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या बळीराम निर्मळ हत्या प्रकरणातील आरोपी रोहिदास निर्मळ याला प्रथम सत्र न्यायाधीश पाटवदकर यांनी दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून अ‍ॅड. मिलिंद केशवराव वाघीरकर यांनी काम पाहिले.



घटनेची माहिती अशी की, मुळुकवाडी येथे २६ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास केशरबाई बळीराम निर्मळ या घरासमोर मूग पाखडत बसल्या होत्या. त्यावेळी त्यांची जाऊ कांताबाई निर्मळ या घराच्या ओट्यावर दात घासत होत्या. दरम्यान, आरोपी रोहिदास निर्मळ हा बळीरामच्या घरा कडे कोयता पाठीमागे लपवून घरासमोर आला. त्याने अचानक केशरबाई यांच्या डोक्यावर व तोंडावर कोयत्याने वार करण्यास सुरुवात केली.

हा प्रकार पाहून कांताबाई यांनी आरडाओरड करत घटनास्थळी धाव घेतली. आवाज ऐकून केशरबाई यांचे पती बळीराम निर्मळ हे घटनास्थळी आले असता आरोपी रोहिदासने त्यांच्या डोक्यावर, मानेवर व खांद्यावर कोयत्याने सपासप वार केले. या घटनेदरम्यान आरोपीचे आई-वडील कौसाबाई व विठ्ठल हे उपस्थित होते. मात्र, त्यांनी आरोपीला रोखण्याऐवजी त्याला प्रोत्साहन दिल्याचा आरोप होता.

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी जखमी बळीराम निर्मळ यांना रुग्णालयात दाखल करण्यासाठी नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. गंभीर जखमी झालेल्या केशरबाई यांना संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर जखमी कांताबाई निर्मळ यांच्यावर बीड येथे उपचार करण्यात आले.

कांताबाई निर्मळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २६७/२०२२ अंतर्गत भारतीय दंड विधान कलम ३०२, ३०७, ३२६, ३२४, १०९ व ११५ नुसार रोहिदास निर्मळ तसेच त्याचे आई-वडील कौसाबाई व विठ्ठल यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक मुस्तफा शेख व हजारे यांनी केला. फिर्यादीच्या अर्जावरून या खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून अ‍ॅड. मिलिंद वाघीरकर यांची ◀◀ पान ३ वर

# बीड येथे गेवराई मतदारसंघातील १०१ आजी-माजी पदाधिकारी व ऊबाठा कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

बीड । प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघातील विविध गावांतील तळागाळातील शिवसैनिक, ऊबाठाचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तसेच आजी-माजी पदाधिकाऱ्यांचा भव्य जाहीर शिवसेना प्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न डॉ. श्रीकांत शिंदे साहेब, बीडचे संपर्क मंत्री भरतशेठ गोगावले, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत आप्पा नवले यांच्या



नेतृत्वामध्ये हा पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला.

गेवराई मतदारसंघातील खेड्यापाड्यातील तळागाळातील शिवसैनिक, ऊबाठाचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तसेच अनेक आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यामध्ये माजी तालुकाप्रमुख सखाराम हाकदार, राजेंद्र मोरे, कल्याण सावंत, माजी उपतालुकाप्रमुख शाहदेव घोडके, बाळासाहेब शेरकर, बंडू ढगे, शाहू पैळ, सुरेश जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होता.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत आप्पा नवले म्हणाले की, गेवराई मतदारसंघातील शिवसेनेत प्रवेश केलेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक दिली जाईल. शिवसेना वाढीसाठी सर्वांनी एकदिलाने काम करावे. तुमच्या प्रत्येक अडचणीसाठी मी कायम उपलब्ध राहील, असे आश्वासन त्यांनी दिले. या पक्षप्रवेशामुळे गेवराई मतदारसंघात शिवसेनेची ताकद आणखी वाढली असून ग्रामीण भागात पक्ष संघटना मजबूत होत असल्याचे चित्र दिसून आले.


या प्रसंगी उपजिल्हाप्रमुख नारायण ◀◀ पान ३ वर

# युसूफवडगांव व परिसरात झालेल्या चक्रीवादळमुळे हाहाकार, फळबांगाचे प्रचंड नुकसान

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव मंडळ आणि परिसरात शनिवारी सायंकाळी अचानक आलेल्या तीव्र चक्रीवादळसदृश वाऱ्याने आणि अवकाळी पावसाने मोठा हाहाकार माजवला आहे.ताशी १२० ते १५० किलोमीटरच्या प्रचंड वेगाने वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे युसूफवडगाव,सादोळा,सोनेसांगवी नं.२,धनेगाव,भालगाव आणि बावची परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून मुख्य रस्त्यांवर मोठमोठी झाडे उन्मळून पडल्यामुळे या भागातील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

या नैसर्गिक आपत्तीत



शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेल्या केळीच्या बागा आणि इतर फळबागा जमिनीदोस्त झाल्या असून नागरिकांच्या घरांवरील पत्रे तसेच घरगुती व कृषी सोलर पॅनेल्स हवेत उडून गेले आहेत.काही ठिकाणी घरांच्या भिंती कोसळल्याच्या घटनाही समोर आल्या असून,सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी नागरिकांचे व शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.या वादळाचा सर्वांत मोठा फटका परिसरातील सार्वजनिक वीज पुरवठा यंत्रणेला बसला असून संपूर्ण परिसर अंधारात बुडाला आहे.उच्चदाब वीजवाहिन्यांचे ◀◀ पान ३ वर

# पहिल्याच अवकाळी पावसामुळे लाईट अभावी चौसाळाकरांचे हाल

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा व चौसाळा परिसरात शनिवारी संध्याकाळी ६ नंतर अवकाळी पाऊस झाला व त्या पावसात चौसाळा परिसरातील विद्युत खंडित झाली त्यानंतर संध्याकाळी रात्रभर विद्युत पुरवठा खंडित होता व दुसऱ्या दिवशीही तीन वाजेपर्यंत विद्युत पुरवठा खंडित असल्यामुळे नागरिकांचे बेहाल झाले संध्याकाळी अर्ध्या तासाचा पाऊस झाल्याने नागरिक सतत लाईटच्या ऑफिसला फोन लावत होते की लाईट कधी चालू होईल पण सतत एक घंटेने दोन घंटेन चालू होईल अशा प्रतिक्रिया भेटत होत्या पण शेवट दुसऱ्या दिवशी उशिरापर्यंत लाईट आली या काळात डासांनी व उकाड्याने त्रस्त चौसाळा नागरिक कडून महावितरण की विचारणा अशी होत आहे की पहिल्याच पावसात जर अशी लाईटी जात असेल अजून पावसाळा सुरू होत आहे तत्पूर्वीच आपल्या लाईन दुरुस्ती करून घ्याव्यात अशी नागरिकाकडून मागणी करण्यात येत आहे

# बीड जिल्हा विकासाच्या प्रतीक्षेत; गुंडागिरी, जातीचे राजकारण आणि बेरोजगारीच्या विळख्यात जनता होरपळतेय

पाटोदा । प्रतिनिधी

गोड बोलून मते मिळवायची, निवडणुकीत जातीचे कार्ड खेळायचे आणि सत्ता हाती येताच पाच वर्षे जनतेला वाऱ्यावर सोडायचे, असाच काहीसा प्रकार बीड जिल्ह्यात सातत्याने पाहायला मिळत आहे. सध्या जिल्ह्यात गुंडागिरी, मारामारी आणि राजकीय वर्चस्वाची लढाई चरमसीमेवर पोहोचली आहे. यामुळे एकीकडे जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली असताना, दुसरीकडे शिक्षण, रोजगार आणि सिंचनासारखे मूलभूत प्रश्न गंभीर बनले आहेत. शेजारील जिल्ह्यांमध्ये नवनवीन कंपन्या आणि एमआयडीसी (चखऊ) विस्तारत असताना, बीड जिल्हा मात्र गुन्हेगारी आणि राजकीय अनास्थेमुळे विकासाच्या शर्यतीत खूप मागे पडला आहे.वाढती गुंडागिरी आणि गुन्हेगारीचा सुळसुळाटबीड जिल्ह्यात सध्या मारामारी आणि गुंडगिरीचा 'ट्रेंड' मोठ्या प्रमाणात वाढला आहे. गल्लीबोळातील वादापासून ते थेट राजकीय वरदहस्ताने होणाऱ्या गुन्ह्यांपर्यंत सर्वत्र भीतीचे वातावरण आहे. राजकीय फायद्यासाठी तरुणांचा वापर गुन्हेगारीकडे वळवण्यासाठी केला जात असल्याचे चित्र आहे. या गुन्हेगारीच्या 'भूता'ने सामान्य नागरिकांचे जगणे असह्य केले असून, कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाजले आहेत.उद्योग शून्य: तरुणांच्या हाताला काम नाहीइतर जिल्ह्यांमध्ये मोठ्या कंपन्या येत आहेत, एमआयडीसीचा विकास होत आहे. मात्र, बीड जिल्ह्यातील एमआयडीसी केवळ नावापुरतीच उरली आहे. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि गुन्हेगारीचे वातावरण यामुळे कोणताही मोठा उद्योग बीडमध्ये येण्यास तयार नाही. परिणामी, उच्चशिक्षण घेऊनही जिल्ह्यातील हजारो तरुणांना रोजगारासाठी पुणे, मुंबई किंवा छत्रपती संभाजीनगर सारख्या शहरांमध्ये स्थलांतर करावे लागत आहे.सिंचनाचा अभाव आणि रखडलेला विकासबीड जिल्हा हा ◀◀ पान ३ वर

# भाळवणीत महिलेसह कुटुंबीयांना मारहाण; जातिवाचक शिवीगाळ व विनयभंगप्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील भाळवणी येथे शेजारी राहणाऱ्या साहेबराव सातारे आणि रमीज पठाण यांच्यामध्ये वऱ्हाडाचा टेम्पो थांबवल्या वरून सुरू असलेला वाद सोडवण्यासाठी गेलेल्या सचिन पवार आणि त्यांच्या भावजयी ला आणि कुटुंबीयांना मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ, विनयभंग व जबरी चोरी केल्याप्रकरणी दुसऱ्या गटातील सहाजणांविरुद्ध आष्टी पोलीस ठाण्यात (अ‍ॅट्रॉसिटी) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे प दलित समाजातून संताप व्यक्त केला जात आहे.

फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार.. दिनांक २३ मे २६ रोजी रात्री ८ वाजता वैशाली बाबासाहेब पवार यांच्या घरासमोर वादविवादाचा आवाज आल्यामुळे त्या घराबाहेर गेल्या असतात त्या ठिकाणी साहेबराव सातारे आणि रमिज पठाण यांच्यामध्ये वऱ्हाडाच्या टेम्पो थांबवल्या वरून वादविवाद सुरू असता वैशाली पवार यांचे दीर सचिन पवार हे त्या ठिकाणी गेले असता आरोपी समीर राजू पठाण याने तू कशाला मध्ये पडतो असे म्हणून मारहाण करून वैशाली पवार यांच्या हाताला वाईट हेतूने धरून स्वतःकडे ओढले व महिलेला लज्जा वाटेल असे कृत्य केले. त्यावेळी "तुम्ही मांगटे-धेडगे का मध्ये पडता" असे म्हणत त्याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, तेथे आलेल्या आलम जमाल पठाण, अमीन आलम पठाण, अमीन आलम बेग व शाहरूख राजू पठाण यांनीही फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना जातिवाचक शिवीगाळ करत "या मांगट्या धेडग्यांना सोडू नका, मारून टाका" अशी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. आरोपींनी हातातील लाकडी दांडके व लोखंडी गजांच्या साहाय्याने फिर्यादी महिला, त्यांचे पती तसेच सासू-सासऱ्यांना मारहाण केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

भांडणादरम्यान समीर पठाण याने फिर्यादी महिलेचे झंपर फाडून त्यामधील ७५० रुपये रोख रक्कम व सोन्याची मोरणी असलेले पाकीट जबरदस्तीने काढून घेतल्याचाही आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर गावातील राजू बापू पवार व अंबादास लक्ष्मण पवार यांनी मध्यस्थी करून भांडण सोडवले. जखमी अवस्थेत फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी आष्टी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना सरकारी रुग्णालयात पाठवले. उपचार घेतल्यानंतर संबंधित महिलेने आष्टी पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली. या प्रकरणी रमीझ राजू पठाण, समीर राजू पठाण, आलम जमाल पठाण, अमीन आलम पठाण अमीन आलम बेग, शाहरूख राजू पठाण सर्व रा. भाळवणी, ता. आष्टी, जि. बीड यांच्याविरुद्ध विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे पाटील हे करत असून, घटनेतील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# सायबर पोलिसांची मोठी कामगिरी: मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना अपहार प्रकरणातील आरोपी जेरबंद; ८१ लाख ७८ हजार रुपये केले हस्तगत

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजने अंतर्गत झालेल्या तब्बल २ कोटी ५१ लाख ५१ हजार ६९२ रुपयांच्या कर्ज अनुदानाच्या अपहार प्रकरणाचा बीड सायबर पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने तपास करत मोठी यशस्विता मिळवली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, अपहार झालेल्या रकमेपैकी ८१ लाख ७८ हजार २८९ रुपये परत मिळवण्यात (फ्रीज करण्यात) यश आले आहे.

या संदर्भात मिळालेली माहिती अशी की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्जासाठी बनावट व खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली होती. त्यानंतर बँकेच्या पोर्टल लॉगिनचा गैरवापर करून हा कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आला. या प्रकरणी उद्योग सहसंचालक (विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) बाळासाहेब त्रिंबक यशवंते (वय ५४) यांनी बीड शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांच्या

### सायबर पोलिसांचे नागरिकांना आवाहन

ऑनलाईन पद्धतीने आर्थिक व्यवहार करताना कोणत्याही अनोळखी फोन किंवा एसएमएस (SMS) ची पूर्ण खात्री केल्याशिवाय व्यवहार करू नका. कोणत्याही अज्ञात व्यक्तीने पाठवलेल्या APK फाईल्स किंवा अनोळखी लिंकवर क्लिक करू नये. आपला ओटीपी (OTP) कोणाशीही शेअर करू नका आणि सोशल मीडिया खाती सुरक्षित (लॉक) ठेवावीत. सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा लूलशीलीळाश.सीं.ळप या संकेतस्थळावर जाऊन आपली ऑनलाईन तक्रार नोंदवावी, असे आवाहन बीड सायबर पोलीस स्टेशनतर्फे करण्यात आले आहे.

फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर नंबर १३९/२०२४, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ३४ भादंवि सह ६६ (ड) आयटी क्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सायबर पोलीस ठाणे, बीड यांच्याकडे सोपवण्यात आला होता.

गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत क्लिष्ट असल्याने सायबर पोलिसांनी तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास व तपास केला. याद्वारे गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करून त्यांना बेड्या ठोकण्यात आल्या. तसेच, तपासादरम्यान आरोपींकडून व बँक खाती गोठवून आजवर एकूण ८१,७८,२८९/- रुपये इतकी रक्कम हस्तगत करण्यात सायबर पोलिसांना यश आले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी बीडचे मा. पोलीस अधीक्षक आणि मा. अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे, सपोनि संदीप आराक, पोउपनि स्वाती लहाने, पोलीस हवालदार पंचम वडमारे, भारत जायभाये, विजय घोडके आणि महिला पोलीस अंमलदार भाग्यश्री काशिद यांनी केली आहे.

# आष्टी परिसरात दुचाकीवरून सोनसाखळी चोरणारी टोळी गजाआड; दोन आरोपींना अटक, ३ गुन्हे उघड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी आणि परिसरात दुचाकीवरून फिरून महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी (चैन) हिसकावणाऱ्या एका टोळीचा छडा लावण्यात बीड स्थानिक गुन्हे शाखा आणि आष्टी पोलिसांच्या संयुक्त पथकाला मोठे यश आले आहे. याप्रकरणी दोन सराईत आरोपींना जेरबंद करण्यात आले असून, प्राथमिक तपासात त्यांनी बीड जिल्ह्यातील चैन स्नॅचिंगचे तब्बल ३ गुन्हे कबूल केले आहेत.



विकास गडया भोसले (वय २२, रा. चिखली, ता. आष्टी, जि. बीड) आणि अरुण बप्पा काळे (वय २३, रा. बोलेगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

एकाच दिवशी घडल्या होत्या ३ घटना

मिळालेल्या माहितीनुसार, ३० एप्रिल २०२६ रोजी आष्टी परिसरात फिर्यादी हे पायी चालत जात असताना, शाईन मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी जबरदस्तीने हिसकावून पळ काढला होता. याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात कलम ३०४(२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. विशेष म्हणजे, याच दिवशी परिसरात अशाच स्वरूपाच्या आणखी दोन घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

२५ गुन्हेगार वस्त्यांची तपासणी अन् १०० हून अधिक उउढत फुटेजचा माग

या गंभीर गुन्ह्यांचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला होता. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने आष्टी पोलीस ठाण्याच्या मदतीने तपास चक्र वेगवान केले. आरोपींचा माग काढण्यासाठी पथकाने जवळपास २५ पेक्षा जास्त गुन्हेगार ◀◀ पान ३ वर

# खळवट लिमगावर आता 'सीसीटीव्ही'ची करडी नजर; वाढत्या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी ग्रामपंचायतीचा स्तुत्य पुढाकार

वडवणी । प्रतिनिधी

उन्हाळ्याच्या दिवसांत वाढत्या चोऱ्या, घरफोड्या आणि जनावर चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी खळवट लिमगाव ग्रामपंचायतीने पुढाकार घेत संपूर्ण गाव आता सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणले आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने तब्बल एक लाख रुपये खर्च करून उत्कृष्ट ऑडिओ-व्हिडिओ गुणवत्ता असलेले सात अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे गावातील महत्त्वाच्या ठिकाणी बसवण्यात आले आहेत. वडवणी पोलिसांनी तालुक्यातील सर्व गावांना सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसविण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत खळवट लिमगाव ग्रामपंचायतीने हा आदर्श उपक्रम राबवला आहे. गावातील मुख्य रस्ता, प्रमुख चौक, रहिवासी वस्ती तसेच मंदिर परिसर अशा संवेदनशील ठिकाणी हे कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मार्च महिन्यात गावातील अभिमान राऊत व हरिभाऊ राऊत यांच्या घरी मोठी चोरी झाली होती. त्या घटनेनंतर गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. भविष्यात अशा घटना



रोखण्यासाठी आणि गावाच्या सुरक्षेला प्राधान्य देत ग्रामपंचायतीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या उपक्रमासाठी गावचे सरपंच गणेश अंभोरे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य तसेच सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत सकारात्मक पुढाकार घेतला. ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले. दरम्यान, खळवट लिमगावच्या या उपक्रमाचे वडवणी पोलिसांकडूनही कौतुक करण्यात आले असून ग्रामपंचायतींनीदेखील या गावाचा आदर्श घ्यावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे. इतर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26